परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १२५ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ मार्च २०२१

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा सस्नेह नमस्कार.***

सन २०२१ मधला मार्च महिन्याचा हा ‘हितगुज’चा अंक १२५वा निघत आहे. कोरोनासारख्या महामारीला पिटाळून लावण्यात आपण यशस्वी होऊन कोरोनामुक्त भारत आत्मनिर्भर होत आहे.

आभासयुक्त जगात आपण प्रवेश केला आहे. त्यामुळे विज्ञानाच्या सहकार्याने आपले कुठल्याही क्षेत्रात अडले नाही. मुले शाळेत न जाता ऑनलाइन अभ्यास करीत आहेत. गाण्याचे, नृत्याचे क्लास ऑनलाइन सुरू आहेत. संस्थांच्या बैठका ऑनलाइन (झूम) सुरू आहेत. मॉलमधून खरेदी ऑनलाइन होत आहे. वैद्यकीय सल्ला ऑनलाइन मिळतो आहे. वर्क फ्रॉम होम घरी कामे चालू आहेत. तात्पर्य माणूस हा धडपडणारा प्राणी आहे. संकटे आली तरी हातपाय गाळून न बसता त्यातून मार्ग काढतो. संघर्ष करीत कोरोनाशी त्याने टक्कर दिली. कोरोनासंबंधात मास्क लावा, सुरक्षित अंतर ठेवा, सॅनिटायझर वापरा इत्यादी स्वच्छतेचे सर्व नियम तो पाळण्याचा प्रयत्न करतो आहे, त्यातच त्याचे भले आहे हे त्यांनी ओळखले आहे.

आपले ‘मराठे प्रतिष्ठान’ही त्यात अग्रेसर आहे. कोरोनाचे सर्व नियम पाळून ‘मराठे प्रतिष्ठान’चा पुणे शाखेचा ४०वा वर्धापन दिन दरवर्षीप्रमाणे इंदिरा मोरेश्वर सभागृह, पुणे येथे सकाळी १० ते ३ या वेळेत साजरा झाला. ‘मराठे प्रतिष्ठान’ची वार्षिक कार्यकारिणी सभा ही याच वेळी घेण्यात आली. शिरूर येथील श्री. गणेश मराठे यांच्या सुरेल गायनाचा कार्यक्रम चांगला रंगला. कोषाध्यक्ष मुलुंडचे श्री. अनंत मराठे यांनी आय व्यय संबंधात विचारलेल्या शंकांचे निरसन केले. कार्यवाह हेमंत मराठे यांनी अहवाल वाचन केले.

मंडळी, दि. २७ फेब्रुवारी मराठी दिन आणि २८ फेब्रुवारी विज्ञान दिन आपण साजरे करणार आहोत. जागतिक कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ आणि विज्ञानवादी लेखक श्री. जयंत नारळीकर हे नाशिक येथे होणाऱ्या ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून लाभले आहेत. सामान्य माणसांपर्यंत विज्ञान पोचविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. साहित्यातून अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रयत्न ते करीत आहेत. हातामध्ये मोबाइल असला तर भविष्य पाहाण्यासाठी मनुष्य त्याचा वापर करतो. शिक्षित लोकांमध्ये ही अंधश्रद्धा पाहायला मिळते ही गंभीर बाब आहे. संमेलनाच्या व्यासपीठावरून नारळीकर काय मार्गदर्शन करतात याची उत्सुकता आहे. डॉ. नारळीकर यांना आणि त्यांच्या असामान्य कार्याला ‘मराठे प्रतिष्ठान’कडून खूप खूप शुभेच्छा!

मंडळी दि. २८ मार्चला होळीपौर्णिमा आहे. होळी पौर्णिमेच्या शुभेच्छा.

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

हिरण्यकश्यपू दानवाच्या बहिणीचे, म्हणजे 'होलिके'चे दहन प्रतिकात्मक पद्धतीने या दिवशी होते. भक्त प्रल्हाद 'नारायण, नारायण' नावाने तरून गेला. होलिका त्याला जाळू शकली नाही. तात्पर्य वाईटावर चांगल्याचा विजय होतो. या विश्वासाचा हा पाया. चंद्रगुप्त राजाच्या काळापासून, म्हणजे चौथ्या शतकापासून प्राचीन संस्कृत वाङ्मयात होळीच्या सणाचे उल्लेख सापडतात. या दिवसाला वसंतोत्सव, रंगोत्सव, प्रेम व स्नेहाचा उत्सवही म्हटले जाते. 'उत्सव' शब्दाच्या आत दडलेला जो संस्कृत शब्द आहे, त्याचा अर्थ, अधिक उन्नत, परिपक्व होत जाणे असा आहे.

या सणाला शिमगा असेही म्हटले जाते. 'आयनाची बायना, घेतल्यावाचून जायना, शबय, शबय' असे म्हणून बोंब ठोकली जाते. पण त्याचा अर्थ फारच थोड्या जणांना माहित असतो.

आय म्हणजे माया, ती नाच करते. 'बा' परब्रह्माचे स्थिर स्वरूप, पण ही माया कोणालाही घेतल्यावाचून जायना. प्रत्येकाने मायेच्या जाळ्यात न अडकता, परब्रह्माची ओळख मानव जन्मात करावी. शबय शबय म्हणजे सावध राहा, ईश्वराला शरण जा.

तेव्हा अशा उदात्त भावनेने होळी पौर्णिमेकडे पाहण्याची दृष्टी मिळते. अशा या होळी पौर्णिमेच्या शुभेच्छा.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. १२ फेब्रुवारी २०२१)

भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/२४१५०८८९

---

# वर्धापन दिन प्रकाशचित्र










# संवाद कुलबांधवांशी

•श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**नमस्कार कुलबांधव आणि भगिनींनो,**

बघता बघता २०२० हे वर्ष संपलं. खरंतर नवीन वर्ष सुरू झाल्यानंतर प्रत्येक जण काही ना काही संकल्प करतो की यावर्षी ही गोष्ट करायची आहे, या वर्षी ती गोष्ट करायची आहे. परंतु २०२० सुरू झाले तेच मुळी कोरोना नामक आजाराचे सावट घेऊन, आणि बघता बघता पूर्ण जग या महामारीमध्ये ओढलं गेलं. नंतर काही दिवस लोकांनी घरात बसून मजेत काढले. परंतु काही दिवसांत वास्तवाचे भान एकेकाला येऊ लागले.

ज्यांची नोकरी, धंदा सुरू होता त्यांना आर्थिक प्रश्न नव्हते मात्र बाकीच्या लोकांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले व यापुढेही लागत आहे. बरेच जणांचे काम सुटले तर काही जणांनी याच संधीचे सोने पण करून घेतले. असो, हळूहळू सगळं रुळावर येत आहे. यातून एक महत्त्वाचा संदेश मिळाला की जे खर्चावर नियंत्रण ठेवतात ते कोणत्याही संकटाला तोंड देऊ शकतात.

या पूर्ण कोरोना काळात आपलं 'प्रतिष्ठान'चे काम ऑनलाइन सुरू होते. मासिक सभा, मुदत ठेवींचे नूतनीकरण, नवीन मुदत ठेवी ठेवणे, वार्षिक हिशोब तयार करून ते मंजूर करून ऑडिट करून घेणे इ. शेवटी वार्षिक सर्वसाधारण सभा राहिली होती, ती संस्थेचा वर्धापनदिन प्रतिवर्षीप्रमाणे ठरवून त्याचवेळी सदर वार्षिक सर्वसाधारण सभा पुणे येथे सर्व नियमांचे काटेकोर पालन करून घेण्यात आली. उल्लेखनीय म्हणजे ५० पेक्षा जास्त कुलबांधव व भगिनी उपस्थित होते. नेहमीप्रमाणेच उत्साहात सभा संपन्न झाली. 'थांबला तो संपला' हे लक्षात ठेवून सुरक्षिततेला प्राधान्य देऊन प्रत्येक काम करण्यात आले. आमच्या सर्व सहकाऱ्यांना यासाठी मन:पूर्वक धन्यवाद.

मंडळी कोरोनामुळे गेले तीनही 'हितगुज'चे अंक आपण 'ई' स्वरूपात प्रकाशित केले व त्याला चांगला प्रतिसाद मिळाला, तसेच खूप जणांनी असे सुचवले की आता याच स्वरूपात अंक काढा, यामुळे आपला छपाई, पोस्टेज वाचेल व अंक लगेच वाचता येईल. कधीही, कुठेही अंक वाचू शकतो. यामुळे आता 'हितगुज'चा अंक तसेच वेळोवेळी आपणाशी पत्ररूपाने साधत असलेला संवाद, तसेच वार्षिक अहवाल हे 'ई' स्वरूपात यापुढे उपलब्ध होतील. यातून जो निधी वाचेल त्यातून आणखी काही मुलांना शैक्षणिक मदत आपण करू शकतो. यासाठी आपण प्रत्येक, म्हणजे जो कोणी हा अंक वाचेल त्याने आपण 'मराठे प्रतिष्ठान'चे प्रतिनिधी आहोत असे समजून ओळखीतील प्रत्येक मराठे कुटुंबीयांना तसेच माहेरवाशिणींना हा अंक वाचण्यासाठी प्रवृत्त करणे हे कर्तव्य समजावे. याच प्रकारे आपला अंक प्रत्येक घरात लहानथोर सगळेचजण मोबाइल, लॅपटॉप यावर सहजपणे वाचू शकतील. कराल ना आपण एवढं?

गेले काही वर्षे एक जाणवतंय की अंक वाचल्यावर अपेक्षित प्रतिक्रिया येत नाहीत. मंडळी असं नका करू. बऱ्यावाईट ज्या काही प्रतिक्रिया असतील त्या आम्हाला आवर्जून पाठवा, तसेच लेखकांचे नंबर दिलेले असतात त्यांनाही फोनद्वारे प्रतिक्रिया द्या.

आपण 'मराठे प्रतिष्ठान'च्या माध्यमातून प्राधान्याने परिवारातील मुलामुलींना शैक्षणिक मदत देत असतो. तसेच काही प्रमाणात समाजातील कमजोर वर्गातील मुलामुलींना देखील मदत देण्याचा प्रयत्न करत असतो. तसेच वैद्यकीय मदत परिवारातील गरजूंना आर्थिक परिस्थितीनुसार दिली जाते. याचा ज्या गरजूंना फायदा घ्यायचा असेल त्यांनी जरूर संपर्क साधावा. तसेच ज्यांना शक्य असेल त्या प्रत्येकाने अधूनमधून संस्थेला देणगी द्यावी, म्हणजे आपण जास्तीत जास्त लोकांपर्यंत मदत पोहोचवू शकतो.

मंडळी हळूहळू सगळं रुळावर येत आहे, तेव्हा आपापल्या क्षेत्रात आपण स्वत:हून छोटे छोटे मेळावे आयोजित करून तुमच्या विभागातील परिवारातील लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न सुरू करायला हरकत नाही. याची माहिती 'हितगुज'मध्ये प्रसिद्धीसाठी अवश्य पाठवावी. याचबरोबर बडोदा येथील अखिल भारतीय संमेलनानंतर आपले संमेलन होणे अपेक्षित आहे. तेव्हा एखाद्या विभागातील कुलबांधव यासाठी इच्छुक असतील तर त्यांनी अवश्य संपर्क करावा. ज्या शहरात किंवा गावात जास्त संख्येने आपले कुलबांधव रहात असतील त्यांनी एकत्र येऊन याचा जरूर विचार करावा. वारंवार संमेलन होत राहिल्यास आपला एकमेकांशी संवाद चांगला होण्यास मदतच होते.

याचबरोबरीने आणखी एक मुद्दा म्हणजे मराठे परिवारातील प्रत्येक सज्ञान व कमावत्या स्त्री-पुरुषांनी 'मराठे प्रतिष्ठान'चे सभासद होणे आवश्यक आहे. माहेरवाशिणी सुद्धा सभासद होऊ शकतात. सभासद वर्गणी फक्त रु.५०० आजीवन आहे.

चला तर मग. येथे मांडलेल्या प्रत्येक मुद्द्यावर अवश्य विचार करावा. आता आपली रजा घेतो. ♦

# जमीन खचली पण...

• श्री. निरंजन मराठे (पृ.१२०), तळेगाव, पुणे भ्रमणध्वनी : ९८२०७३४८८४

**ट्रेकिंग हा धाडसी, हौशी खेळ, पण कधी कधी अति धाडस अंगाशी येण्याची शक्यता असते. अशा वेळी वाचवतं ते आपले नशीब आणि नशिबापेक्षाही निसर्ग... हो ना... त्याची साथ नसेल तर... पुरंदर किल्ल्यावरील ट्रेकिंगच्या दरम्यान अचानक जमीन खचली आणि...**

**१३** जुलै २००९... फ्रेंड्स ट्रेकिंग ग्रुपतर्फे आम्ही २५ जणांचा ग्रुप पुरंदर-वज्रगड सर करायला निघालो... एकमुखी दत्ताचे गाव... म्हणजे नारायणपूर... साधारण सहा-सात तासांच्या प्रवासानंतर आम्ही तिथे पोहोचलो... बसमध्ये झोप चांगली मिळाली होती... पावसामुळे वातावरणात चांगला गारवा होता... पाण्यात हात घालवत नव्हता एवढे थंड होते. तरीही पाण्यात हात घालावा लागला... हाताला कापरे भरले, वात हातात शिरला... शेवटी मग जरासा वॉर्म अप... हात झटकल्यानंतर वात गेला... मग एका टपरीवर गरम गरम चहा झाला. थंडीवरचा गावठी उपाय.

आमच्या ग्रुपचे नेतृत्व अरुणकडे होते. रवी आणि हेमंतने पिछाडी सांभाळली... पुरंदर चढायला सुरुवात करतानाच पावसाची हजेरी झाली. साधारण सकाळचे आठ-नऊ वाजले असतील. इथल्या चर्चपर्यंत पोहोचल्यावर पावसाने चांगलाच जोर धरला. थांबण्याशिवाय पर्याय नव्हता. साधारण २० ते २५ मिनिटे पावसाने वाया घालवली. पाऊस थांबला आणि आम्ही निघालो...

अरुण आणि निधी अधिक पुढे पुढे निघाली. रवी आणि हेमंत मागे होते. मी मात्र मध्येच एकटा होतो. पुढचे पुढे गेलेले आणि मागचे बरेच लांब राहिलेले. मी एकटाच... आणि वाट सापडेनाशी झाली. वेडे धाडस करण्यात अर्थ नव्हता. मी सरळ परतीची वाट धरली. म्हणजे मागून येणारे तरी भेटतील. पायवाटेने हळूहळू मागे आलो. थोडंसं अंतर गेलो आणि रवी, हेमंत भेटले... जिवात जीव आला. हायसे वाटले तोच... धडाड्... सरसर... धाड मोठ्ठा आवाज झाला. पुढे एनसीसीचा ग्रुप गेलेला. त्यामुळे कवायतीचा काही प्रकार असावा असे वाटले. रवी, हेमंत दोघांबरोबर मी परत पुढे निघालो... आणि धक्काच बसला. पाहिले तर मी ज्या पायवाटेवरून मागे परतलो ती पायवाट साफ नाहीशी झाली होती. त्यावरची जमीन खचली होती आणि अख्खा मातीचा कडा त्यावर कोसळला होता. दोन-चार झाडेही त्याबरोबर खाली आली होती... सगळीकडे चिखल झालेला. पुढे पाऊल टाकलं आणि लक्षात आलं... काही सेकंदापूर्वी आपण येथूनच पार झालो. काळ आला होता पण वेळ चुकली होती... मी तिथे असतो तर माझीही पायवाट झाली असती. पण नशिबाने साथ दिली आणि निसर्गाने हात दिला.

तो चिखल तुडवत, निसर्गाचे, देवाचे आभार मानत मी पुरंदर गाठला. उतरताना अरुणसह सहकाऱ्यांना तो स्पॉट दाखवला. सगळेच अवाक् झाले. निसर्गाने तशी शिकवण दिली. ट्रेकिंग एकट्या दुकट्याने करू नये. ग्रुपला सोडून जाऊ नये ही शिकवण मनात ठेवूनच आम्ही वज्रमाळेकडे निघालो... ♦

## मानसन्मान

वक्तृत्व स्पर्धा (लहान गट) चि. चिन्मय शशांक मराठे (पृ. ३९६) यास स्वच्छ सर्वेक्षण २०२१ व 'माझी वसुंधरा मोहिम' या अंतर्गत वेंगुर्ला नगरपरिषदेद्वारा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेतलेल्या जनजागृतीवर वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. 'किरात'च्या संपादिका सौ. सीमा मराठे यांचा चिन्मय सुपुत्र आहे. 'मराठे प्रतिष्ठान'द्वारा चि. चिन्मयचे हार्दिक अभिनंदन!

श्री. सुनील तथा मेघःश्याम मराठे (पृ. ३९६) यांचा सन्मान वेंगुर्ला शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या ५ गौरवमूर्तींचा डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. गिरीश मसुरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. 'किरात' मुद्रणालय व साप्ताहिकाचे प्रकाशक तथा व्यवस्थापक सुनील तथा मेघःश्याम मराठे यांचा शाल, श्रीफळ आणि रोटरी व्होकेशनल ॲवॉर्ड सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.
'मराठे प्रतिष्ठान'द्वारा श्री. सुनील तथा मेघःश्याम मराठे यांचे हार्दिक अभिनंदन!

# जन्म नवा

• सुधाकर द. मराठे (पृ. २५२), पुणे भ्रमणध्वनी : ९८२२३२९७७०

**श**हरातल्या एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये मी 'सोशल वर्कर' होते. छळवणूक होणाऱ्या, स्वतःला जाळून घेणाऱ्या, विधवा, घटस्फोटिता, वाम मार्गासाठी फसविलेल्या अशा मनोबल हरविलेल्या, असंख्य तरुणी, प्रौढा, अगदी कुमारिका, शिक्षित, अशिक्षित स्त्रियांसाठी मी कार्यरत होते. त्यांच्या समस्या सोडवणं, आधार देणं, पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे इ. कामे मी करीत होते.

सर्वांपासून अलिप्त राहून, कुणातही न गुंतता अशी कामे करणे, म्हणजे तारेवरची कसरतच! अर्थात ती मीच तर आनंदाने स्वीकारली होती. कारण मलाही माझ्या प्रेमभंगाचे दुःख विसरायचे होते.

नवे दुःख, नवीन समस्या, अडचणी ऐकून, बघून मन विषण्ण व्हायचं, नवऱ्यांनी मारहाण केलेल्या, उपाशी ठेवल्या गेलेल्या, अर्धवट पेटलेल्या एक ना दोन प्रकार; पण मरणाच्या दारात मात्र बऱ्याच जणी आपला जबाब फिरवायच्या, नवऱ्याला काही होऊ नये म्हणून धडपडायच्या, तेव्हा मात्र माझ्या मेंदूच्या शिरा त्रस्त व्हायच्या, स्त्रीची भयाण अवस्था बघून वाटायचं खरंच आम्ही स्त्रिया इतक्या दुबळ्या आहोत? का जात्याच स्त्री हृदय दुबळंच असतं?

असंख्य विचारांनी मन पोखरून निघे, पण... ...पण मी तरी कुठे वेगळी होते? 'अनिल'ला मी तरी काही शिक्षा करू शकले? का मी ही तशीच; 'दुबळी, असहाय्य, सहृदयी?'

'उषा'च्या केसमध्येही मी गुंतत गेले होते; तिच्या तान्हुल्यासह तिला, पोलिसांनी आमच्या स्वाधीन केले होते, ५-६ दिवसांची ओली बाळंतीण, जीवन संपवायला गेली होती. तिच्या घरचे तिला स्वीकारायला तयार होते. पण बाळांशिवाय! कारण 'कुमारी माता!' म्हणूनच तान्हुला ५-६ दिवसांचा असतानाच 'उषा' अंधकाराने झाकोळली होती; बाळाला घेऊन जायचं कुठे? जगायचं कसं? कमाईचं काय? घर, समाज, तरुण वय, लोकांच्या नजरा, एक का दोन प्रश्न? एखादी मैत्रीण सांभाळेल पण, पण किती? पुढे काय? बाळाचे काय? अशा प्रश्नांना उत्तरं नव्हतीच. म्हणून तर आत्महत्या करणार होती, बाळासह! तसा प्रयत्न करतानाच एकाने तिला वाचविले होते. भला माणूसच तो, ओळखीच्या पोलिसांतर्फे आमच्या हॉस्पिटलमध्ये तिला दाखल केले होते.

म्हणूनच कायद्याला सामोरे जातच, पोलिसांनी रीतसर गुन्हा दाखल केला होता; त्यानुसार एका महिला सुधार गृहातर्फे ती हॉस्पिटलमध्ये दाखल झाली होती आणि तिची 'केस' माझ्याकडे आली होती.

'उषा'ला मी समजावीत होते. 'बाळाला स्वतंत्रपणे वाढू दे, त्याला जवळ ठेवण्याचा, अट्टाहास करू नकोस.'

'नाही, ते शक्य नाही' उषा ठामपणे नकार देई.

तरीही समजावतच एक दिवस मी तिला म्हटले.

'उषा, वेडेपणा करू नकोस, अनेकजण अशा बाळांना दत्तक घेतात, अशा संस्थाही आहेत, मी मदत करते. एखादा निपुत्रिक सधन त्याला दत्तक घेईल, अनेक अपत्यहीन दांपत्ये मिळतील, त्यातीलच कोणीतरी तुझ्या बाळाला वाढवतील, शिकवतील, मोठा करतील बघ विचार कर.'

रोजच्या माझ्या अशाच उपदेशाने उषाही हळूहळू तसाच विचार करत असणार याची मला खात्री होतीच.

'हे बघ उषा ह्या बाळाच्या जन्मदात्याचे नाव मला सांग, आपण त्याला धडा शिकवू, शिक्षा होईल असेही बघू, गुन्हा दाखल आहेच'... एक दिवस मी तिला म्हटलं होतं.

'नाही', मुळीच नाही' रागानेच उषा म्हणाली होती. 'मला लाचारी नकोय आणि दयाही! माझं मीच भोगेन, खूप कष्ट करीन, बाळाला शिकवीन, मोठा करीन, या शहरातून निघून जाईन, पण त्यांचे नाव सांगणार नाही.'

उषाचा निर्धार पक्का असल्याचे मला जाणवले होते.

'पण त्याला तुझी अवस्था समजली होती?' मी विचारले.

'हो, नक्कीच' मी आपल्या बाळाची आई होणार आहे, आपण लग्न करूच.'

असे ऐकताच मात्र तो कावरा बावरा झाला होता खरा, पण त्याला असा अनुभव नवीन नसावा, शिकलेला आणि तिशीचा होता. मी मात्र अडाणी, जेमतेम इ. १०वी झालेली, १८-१९ वय.'

'मला त्याने नुसते झिडकारलेच नाही तर स्पष्टपणे म्हटले.'

उषाने बहुधा सारे हृदयातच साठवलेले होते.

'चूक तर तुझीही आहेच ना' मी पत्नी म्हणून कधीच

तुझ्याकडे पाहिले नाही, तूच स्वतःला सावरू शकली नाहीस, सारं तुलाही हवं होतंच की, म्हणून तर हे...

त्याचे हे शब्द माझ्या काळजाला चिरून गेले, आणि 'डोळे पुसण्यासाठीही तो फिरकलाच नाही.'

'उषा'चे ते उद्विग्नतेचे बोल ऐकून मीही चमकलेच होते, आपल्यालाही असंच... 'अनिल'... 'अनिल'ने...

'मीही त्याला पुन्हा भेटले नाही. याचनेने हात पसरले नाहीत. चूक घडून गेली होती... बस् पुन्हा त्याचा विचारही नाही, मी अन् माझा हा छकुला... बस्स.'

'उषा' आत्मविश्वासाने सांगत होती आणि उषाला मी माझ्यातच पाहू लागले, माझ्याही जखमांवरची खपली जणू तिनं काढली होती.

आणि तीच उषा आज मला भेटायला आली होती. जवळजवळ एका दशकानंतर, किती बदलली होती ती. सुखी, समाधानी दिसत होती.

'तडजोड करून भूतकाळ विसरायचा आणि नव्याने आयुष्य जन्मायचं, जगायचं; सन्मानानं, आत्मनिर्भयतेने! जीवन तर मुळीच संपवायचे नाही.'

असा सल्ला मीच तर तिला दिला होता आणि बाळाला दत्तक देण्यासाठी तिचं मन तयार केलं होतं, तिनं शिकावं, स्वतःच्या पायावर उभं रहावं म्हणून तिला हरप्रकारे मदत केली होती. कायदेशीर मार्गानेच पोलिसांकडून तिची सुटका केली होती, इतकंच नव्हेतर तिचं बाळही सुसंस्कृत, चांगल्या घरांत 'दत्तक' जाण्यासाठी मदत केली होती.

तीच 'उषा' आज यशस्वी झाली होती, तिच्या संसारात ती रमली होती. नव्याने संसार थाटून, कष्ट करून नवऱ्याच्या केटरिंगच्या व्यवसायाला हातभार लावत होती, पूर्वायुष्याच्या कोणत्याही खुणा तिच्या चेहऱ्यावर, शरीरावर दिसत नव्हत्या, किती खूश आणि आनंदी दिसत होती ती, आणि....

'आणि... मी?

'मी मात्र आहे तेथेच आहे, का मीही बदललेय? सुखी, समाधानी आहे? 'उषा'सारखी? इतरही अनेक जणींसारखी? कितीतरी पीडित स्त्रियांना मी मार्ग दाखवलाय, त्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण केलाय, आत्महत्या करण्यापासून रोखलंय, नवजन्म दिलाय, नवजीवनाचा मार्ग दाखवलाय.'

आणि माझे आयुष्य...?

छे; अशा विचारांनी मी थोडीशी, क्षणभरच गोंधळले आणि माझं मलाच हसू आलं. नाही... मी घेतलेल्या माझ्या निर्णयांवर मी ठाम आहे. जे आयुष्य मी स्वीकारलंय ते पूर्णतः माझेच!... फक्त... फक्त माझेच आहे, जे मी पूर्ण विचाराअंतीच स्वीकारले आहे.

भले मी लग्न नाही केले. आजूबाजूच्या सामान्य स्त्रियांसारखं माझं जगणं तर मुळीच नाही. ज्याने फसवले त्याच्याबद्दल अथवा तमाम पुरुष जातीवर रागही नाही. उलट इतके छान आयुष्य मिळाल्याबद्दल मी 'अनिल'ची आभारीच आहे.

'अनिल'... विसरायचंच सारं... पुनः पुन्हा... त्याची आठवण... 'अनिल'... नकोच... ते...

अजाण वयात मी फसवले गेले हे मान्य... पण तेव्हाच घरच्यांनी मलाही झिडकारलंच की, त्यांनी माफ केलं असतं तर मीही सावरले असते... नक्कीच, कदाचित इतरांसारखंच आयुष्य जगले असते... नवरा... मुलं-बाळं... सुना... जावई... नातवंडं... सुखी समाधानी संसार... आयुष्याची... स्त्री जन्माची पूर्तता... धन्य झालेली स्त्री, 'आई'सारखी... हं... आई...

आपली आई... बिचारी हतबलच होती. मी घरी मोठ्या विश्वासानं सारं काही सांगितलं होतं... आई समजून घेऊन माफ करणारंच असा आपल्याला विश्वासच होता की, तीच बाबांना आणि 'दादा'ला समजावेल असे वाटले होते... 'बाबा' आणि 'दादा'... छे...

धर्म, उच्च जात, खानदान, समाज या सर्व रूढी परंपरेतच 'बाबा' गुंतलेले... वेगळा विचार नाहीच, तसाच 'दादा' - फक्त वयाने, तेही २-२॥ वर्षांनी मोठा म्हणूनच 'दादा!' शिक्षण उच्च! पण विचार 'अशिक्षितच!' कायम फक्त बहिणीवरच दादागिरी... आपल्या येण्या-जाण्यावर 'वॉच' ठेवणारा, वारंवार फक्त उपदेशाचे 'डोस' पाजणारा; खरं तर 'मित्रा'सारखाच, पण स्वतःसाठी, स्वतःच्या मित्रमैत्रिणींना हवा तसा, पण माझ्या मित्रमैत्रीणींवर संशय घेणारा... संशयी आणि हेकेखोर 'बाबां'सारखाच. माझे प्रकरण समजल्यावर घराबाहेर जा म्हणणारा.

'बाबां'ची तोंड काळं करं' म्हणून दिलेली आज्ञा, दादाची 'दादागिरी' आणि आईची 'असहायता'...

मी तरी काय करणार होते? कोणाकडून कसलीही सहानुभूती तर नाहीच, पण 'संभाषण'ही बंद आणि घराबाहेर न पडण्याची 'ऑर्डर'... मित्रमैत्रिणी तर दूरच. पण इतरांचीही वागणूक तशीच... जणू मी एक घोर अपराधी होते... घराण्याला कलंक..., सर्वांचीच 'अब्रू' घालवणारी बदनाम 'स्त्री'...

दिवसेंदिवस आपल्याला ही घुसमट जाणवू लागली होती, घरी रहात होतेच, दोन वेळचं खाणं, तेही समोर आपटलेलं, सहानुभूती तर नाहीच. पण संवादही बंद! सगळ्यांचाच 'बाबा', 'दादा' आणि 'आई'चाही. काय करू शकत होते मी?

विचार करून करून, 'रात्री' जागतच काढत होते. एकटेपणाने; पण एका पक्क्या निर्धाराने. आपलं आयुष्य आपणच उभं करायचं... कोणाची साथ मिळो अथवा न मिळो, पण समाजापासून पळून जायचं नाही, उभं राहायचं निर्धाराने, ताठ मानेनं 'स्त्री' असले तरी... 'जीवन' तर मुळीच संपवायचे नाही. जगायचंय... 'स्त्री' म्हणूनच. पण 'माणसांसारखं... बस्...

एक वेगळ्याच 'निर्धाराने' सकाळी मी उठले, जुजबी कपडे घेतले, बाबांना नमस्कार केला, त्यांनी तोंड फिरवलेच, 'बंधुराज'ही घुश्श्यातच होते... त्याला आणि आईला 'नमस्कार' केला... अगदी वाकून...

'मी आजपासून येथे राहणार नाही' माझं मीच जगणार आहे. तुमच्यापासून दूर राहणार आहे. तुम्हाला कोणताही त्रास नसेल, जमेल तसा संपर्क करण्याचा प्रयत्न करेन, पण खात्री नाही... आणि 'हो' मी जगणार आहे. आत्महत्या वगैरे करणार नाही... तसंच पोलीस कायदा वगैरे भानगडीत पडू नका... मी सज्ञान आहे, जगणार आहे... सन्मानाने, निर्भयतेने...'

तडकाफडकी मी घराचा निरोप घेतला होता आणि मागे वळूनही न पाहता निघाले... आईचा व्याकूळ आणि हतबल चेहरा मात्र मी निर्धाराने विसरत गेलेच... पुन्हा कधीही इकडे न येण्याच्या इराद्याने... कायमचीच.

काय फरक होता 'उषा'मध्ये नि माझ्यामध्ये? माझे प्रतिबिंबच तर मी पहात नव्हते ना? तिचा तो 'बेनामी' अन् माझा 'अनिल'...

सैरावैरा मनानेच आपणही घराबाहेर पडलो होतोच की, असंख्य प्रश्नचिन्हांचे ओझे घेऊनच, आपल्या पदरी 'बाळ' नव्हतं, पण 'बळ' तरी कुठे होते?

समोरच पोलीस चौकी दिसली, धाडसानेच आत प्रवेश केला.

'मला मदत हवी आहे... माणूस म्हणून; माझी कोणाबद्दलही तक्रार नाही; मदत मिळेलच या खात्रीने आलेय?'

प्रथमच पोलीस चौकी पाहिली होती; तरीही धाडसानेच मी इन्स्पेक्टर जाधवांसमोर मी माझी व्यथा आणि कहाणी स्पष्टपणे मांडली, त्यांनीही शांतपणे ऐकून घेतले. कोणताही गुन्हा किंवा तक्रार न नोंदवता मोठ्या भावाच्या नात्याने मला मदतीचा हात दिला. स्त्रियांना मदत करणाऱ्या संस्थांना स्वतःच फोन केले, आणि त्यांच्या प्रयत्नानेच 'भगिनी' स्त्री आधार केंद्राने मला 'आधार' दिला होता, 'आशा'ताईंनीही मला मोठ्या 'आशे'ने मदत केली होती. दिवसभर काम करण्याच्या बदल्यात त्यांनी मला तेथेच राहण्यासाठीही 'हात' दिला होता.

माझे बऱ्यापैकी शिक्षण होतेच, तेथील स्त्रियांना शिकवणे, स्वच्छता आणि इतर शारीरिक गरजांचे महत्त्व समजावणे, निराधारांना मानसिक बळ देणे, यासारखी कामे मी आवडीने करू लागले होते. अशा कामात मी गढून गेले होते. घर आई, बाबा, दादा यांना विसरण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्याकडूनही कोणतीच प्रतिक्रिया नव्हती, त्यांनी माझा शोध घेण्याचा प्रयत्नही केला असेल, नसेल माहीत नाही.

मलाही त्यांच्याशी संपर्क नकोच होता की, अगदी 'अनिल'शीही...

केंद्रात काम करण्यात मी रमू लागले होते. तेथे नियमित येणाऱ्या स्त्री डॉक्टरांकडून मला उपचारांची, स्त्री आजारांची जुजबी माहितीही होऊ लागली होती. हळूहळू 'भगिनी'मध्ये आपण रमत गेलो होतो, आता केंद्र हेच माझे घर झाले होते. आशाताईंनीही मला आपलेसे केले, माझं वागणं, स्वभाव, राहणी, शिक्षण आणि गतआयुष्य विसरण्याचा प्रयत्न बघून आशाताईंनी मला तेथेच कायमचा आश्रय देण्याचा निर्णय घेतला होता.

लवकरच मला एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये 'सोशल वर्कर' म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. केंद्रात नेहमी येणाऱ्या 'गोखले' डॉक्टर मॅडमने आग्रह केल्यामुळेच आशाताईंनीही मला प्रेमाने निरोप दिला होता. पुन्हा जरूर भासल्यास मी आश्रय केंद्रात नक्कीच येईन, आणि वारंवार भेटही घेईन हा विश्वास मी त्यांना दिला होता आणि आजपर्यंत त्या विश्वासाला मीही तडा जाऊन दिला नव्हता.

'उषा'चा नवा अवतार मला भावला होताच. मीही आज तिच्यासारखीच आनंदी, समाधानी आहेच की, या एक वेगळ्या समाधानानेच मी घरी परतले.

'घर'... माझं 'घर' हक्काचं. काय कमी आहे माझ्यात? 'उषा'सारखे लग्न झाले नसेल. पण संसार म्हणजे फक्त 'पुरुष सहवास' आणि 'आई'पणासाठी?

हे हॉस्पिटल, भगिनी केंद्र हाच तर माझा संसार आहे. आज मी सुखासमाधानात आहेच. माझं घर, माझी पुस्तकं आणि गरजू स्त्रिया, पोटापुरतं खाणं आणि सुखाची झोप. सख्या, सोबती आहेतच की, मनासारखी राहतेय, कुणातही गुंतणं नको आणि अपेक्षाही. माझ्यासारख्या असंख्य स्त्रिया आहेतच. अन्याय, अत्याचार सहन करतच जगतात, 'कटू' पण सत्यच ना? शिवाय स्वतःचा 'पुरुष' म्हणजे सुरक्षितता हे तरी कोठे खरं आहे? तसंच असतं तर अनेक लैंगिक आणि स्त्री अत्याचारांच्या घटनांत विवाहित पुरुष सापडलेच नसते. किंबहुना अशा घटनांत असेच निकटचे वा ओळखीचे पुरुष असण्याचे प्रमाण काय

कमी आहे?

विचार करीतच जेवणही झाले. ‘सोशल वर्कर’ म्हणून मी समाजात, समाजासाठी काय काय केले आहे, अनेक निराधार फसविल्या गेलेल्या तरुण, वयस्कर, कुमारिका एक ना दोन प्रकार, माझ्या प्रयत्नाने मी अनेकांना मदतीचा हात दिला. आज ‘उषा’सारख्या अनेकजणी येतात. ‘आभार’ मानतात. हा आनंद काय कमी आहे? हेच तर माझं जग. या पसाऱ्यात रमण्याचा आनंद कितीतरी पटीने अधिकच आहे.

सर्व आवराआवरी होताच मी भानावर आले, संपूर्ण गत आयुष्याच्या आठवणी क्षणभरासारख्याच वाटल्या आणि गत आयुष्यही क्षणभरातच मी विसरून गेले.

छानसे पुस्तक हाती घेतले, रेडिओ सुरू केला आणि अचानकच कानी आलेल्या सप्तसुरांनी मी सुखावत गेले...

‘एकाच’ या जन्मी जणू फिरूनी नवे
जन्मेन मी... नवे जन्मेन मी...’

डोळे आपोआप जड होत गेले. पुस्तकही बाजूला केले गेले. जवळचाच ‘टेबल लॅम्प’ बंद करतच मी हळूहळू सुखी, समाधानी झोपेच्या आधीन होत गेले..., शांतपणे... अगदी शांतपणे, आणि निश्चिंतपणे.


बाळ मराठे, पुणे
भ्रमणध्वनी : ९८२२३२९७७०
दूरध्वनी : ०२०-२४२१०१९८



# वाचकांचा पत्रव्यवहार

दि. १२ फेब्रुवारी २०२०

प्रति,
डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे
संपादिका, ‘हितगुज’, मराठे प्रतिष्ठान
८/१३ सहकार नगर
वडाळा, मुंबई ४०० ०३१

आदरणीय महोदया,

मला डिसेंबर २०१९च्या ‘हितगुज’ अंकातील ‘अग्निसंस्कार’ कथा (?) आपल्या म्हणण्याप्रमाणे सत्य हकिकत मनाला खूपच भावली. मला माझ्या मोठ्या बहिणीची आठवण झाली. मन विदीर्ण झाले. तिची हकिकत मी पुढील अंकात (जून २०२०) जरूर पाठवीन.




अग्निसंस्कार वाचताना आपल्या ललित लेखनाची मजबूत पकड लक्षात आली. संतांच्या मांदियाळीवरील आपले लिखाणही अत्यंत वाचनीय असते. असेच संतांबद्दलचे लिखाण प्रत्येक अंकात येईलच ही खात्री आहे. आम्ही वाचक नक्कीच वाट पाहू यात संशय नाही.

आपला
अ.म. चक्रदेव (पृ. ७३२), पुणे

**।। श्री योगेश्वरीची आरती ।।**
**(नं. २)**



जयदेवी जयदेवी जय योगेश्वरी ।।
आरती करतां येई भक्ती अंतरी ।।धृ.।।
कोकण भू रामाने निर्माण केली ।।
सुजला सुफलासाठी वृक्ष लता वेली ।।
चौदा गोत्रज आले आंबेहुन खाली ।।
साठ कुटुंबे मनुजें अवनी फुलवीली ।।१।।

सागरतीरा चौदा मृत देह आले ।।
भार्गवरामें त्याना संजीवित केले ।।
चितीवरच्या देहाना पावन तूं केले ।।
चितपावन नामे ते येथे राहिले ।।२।।

लग्नासाठी युवती कोणी देईना ।।
म्हणून सत्वर गेले अंबे निजधामा ।।
कुलदेवी योगेश्वरी तुम्ही अट माना ।।
मानुनी, लग्नानंतर आले ते सदना ।।३।।

कोकण जोगेश्वरी गेली लग्नाला ।।
आंबेजवळी राही ती मुक्कामाला ।।
परळी वैद्यनाथ वर तो योजियला ।।
नाखूष झाली, राही कुमारिका बाला ।।४।।


**रचयिता :- श्री. श्रीनिवास कृ. मराठे**
मु. हंसापूर, पोस्ट - कासारवर्णे,
ता. पेडणे, गोवा, पिन ४०३५१२
दूरध्वनी ०८३२-२२०५१४४

# नशीब तर आहेच, पण...

• श्री. जयंत र. मराठे (पृ. ५१०), पुणे भ्रमणध्वनी : ९०९६०८३९५२

प्रेक्षकहो मी निशा लिमये आपल्या सर्वांचे स्वागत करते. आठवड्यातील प्रत्येक शनिवारी आम्ही आपल्यासाठी 'नशीब तर आहेच, पण...' या मालिकेतील अनुभव सादर करीत असतो. आज या कार्यक्रमात भाग घेणार आहेत. 'बेस्ट बँके'चे मुख्य प्रबंधक श्री. प्रशांत कार्लेकर.

निशा लिमये – नमस्कार कार्लेकर साहेब, आज आमच्या 'नशीब तर आहेच, पण...' या कार्यक्रमात तुमचे स्वागत आहे. बँकेतील आपल्या नोकरीच्या निमित्ताने तुमचे अनेक क्षेत्रांतील लोकांशी संबंध येत असतात, तर या कार्यक्रमासाठी आपणाला काही सांगता येण्यासारखे अनुभव आहेत का?

प्रशांत कार्लेकर – नक्कीच, माणसाच्या जडणघडणीत नाही पण व्यवसाय, उद्योगाच्या जडणघडणीत बँका नेहमीच भागीदार असतात. बँकेच्या अर्थसहाय्याने `अगदी शून्यांतून उद्योगाचा डोलारा निर्माण करणारे आहेत. तसेच यश पचवता न आल्यावर कोठे थांबायचे ते न कळल्यावर स्वतः बुडाले आणि त्यांनी बँकेलाही बुडविले, असेही लोक आहेत. जीस जॅकसन याचे प्रसिद्ध वाक्य आहे. Attitude not aptitude determines your Attitude.

निशा लिमये – खरोखर फार सुरेख कोटेशन आहे. आज आम्हां सर्व रसिक श्रोत्यांना व प्रेक्षकांना आपला असा एखादा अनुभव ऐकण्यात आनंद होईल.

प्रशांत कार्लेकर – अवश्य, निशाताई मी आज तुम्हाला अशीच एक प्रत्यक्ष घडलेली घटना सांगणार आहे. मी त्या वेळी कोल्हापूर जिल्ह्यातील एका ग्रामीण भागातील गावात ब्रँच मॅनेजर म्हणून नियुक्त झालो होतो. आता शहरातून ग्रामीण भागात आणि एखाद्या खेड्यात तुम्ही येता तेव्हा सर्व गोष्टींवर नाराज असता. कारण शहराच्या सुखसोयी येथे नसतात. पहिले सहा महिने नाराजीत गेले. पण मी मग पक्कं ठरवलं की, इथे आपणाला रहायचंच आहे. तर या परिसराचा, खेड्याचा आपण नीट अभ्यास करू या. बँकेच्या हिताच्या तसेच गरजू लोकांच्यासाठी नेमकं काय करता येईल त्याचा अभ्यास करू या. गाव खेडेगाव होते तरी चांगलं चौ रस्त्यावर आजूबाजूच्या गावातून लोक येथील दवाखान्यात येत. कापडाच्या, भांड्याच्या खरेदीसाठी येत. गावात चांगले तीन, चार डॉक्टर होते. कापडांची, भाड्यांची आठ, दहा दुकाने होती. दोन हायस्कूल व जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा होती. पण चांगलं हॉटेल नव्हतं.

मी रोज पहाटे फिरायला जात असे. तेव्हा चौ. रस्त्याच्या कोपऱ्यावर एक लहानसं चहाचं दुकान होतं. मी त्या मालकाला उठवून चहा करायला सांगत असे. तो सुद्धा मी फिरून परत येईपर्यंत चहा तयार ठेवत असे. सकाळी ५।। ते ६ वाजता चहा घेणारा मी एकमेव गिऱ्हाईक होतो. पण हळूहळू आणखी चार पाच जण चहासाठी तिथे जमायला लागले. मालक वयस्कर होता. मी एकदा संध्याकाळी चहासाठी गेलो तर मालकाचा तरुण मुलगा जगन तिथे होता. त्याला म्हटले, 'अरे भल्या सकाळी आम्ही तुझ्या म्हाताऱ्या वडिलांना चहासाठी त्रास देतो, तू जरा लवकर उठून चहा करत जा.' माझ्या बोलण्याचा त्याच्यावर काय परिणाम झाला माहीत नाही. पण दुसऱ्या दिवसापासून सकाळी जगन चहा देऊ लागला. काही दिवसातच जगनची आणि माझी मैत्री वाढली. मी त्याला हॉटेलचं ओबडधोबड स्वरूप बदलून चांगले फर्निचर, स्वच्छपणा, रंगरंगोटी, जागेची दुरुस्ती हे कसे आवश्यक आहे व ते केल्यावर धंदा चांगला वाढेल हे पटवून दिले. आमच्या बँकेमार्फत काही कर्ज देता येईल का ते पाहतो असे सांगितले. त्याला ते पटलं. तो तसा बारावीपर्यंत शिकलेला होता. घरी वडिलांचा कर्जाला विरोध होता. त्यांचीही समजूत काढली. लवकरच जगन कामाला लागला आणि पुढच्या दोन महिन्यांत 'शिंदे रेस्टॉरंट' असे चकाचक हॉटेल उभे राहिले. 'निरनिराळे चमचमीत पदार्थ बनविणारा 'मालवाला' (आचारी)' जगनने आणला. थोड्याच दिवसात हॉटेल 'हाऊसफुल्ल' चालू लागलं. कर्जाच्या हप्त्याकडे माझे बारकाईने लक्ष होते. अवघ्या दीड वर्षांत जगनने हॉटेलचे कर्ज फेडले. हॉटेलच्या शेजारची मोकळी जागा विकत घेतली. त्याच्या बहिणीचे लग्न व त्याचा खर्च त्याने केला. आता वडील जगनवर खूश होते. एके दिवशी बँकेची वेळ संपता संपता जगन माझ्याकडे आला आणि म्हणाला, 'मला टेम्पो घ्यायचाय' आजूबाजूच्या गावात कोणाकडे वाहन, टेम्पो माल न्यायला व माणसंपण न्यायला उपयोगी पडेल. खरे म्हणजे टेम्पोतून माणसे नेणे बेकायदेशीर आहे. पण खेड्यांतून हे चालतं तिथं क्वचितच

कोणी आरटीओचे लोक येतात. ग्रामीण भागातील जगन व त्याचा भाऊ भरत दोघांच्याकडेही ड्रायव्हिंग लायसन्स होते. मी त्याला (जगनला) मार्जिन मनी दुरावा रक्कम तुला घालावी लागेल हे स्पष्ट केले. त्याने पासबुक माझ्यासमोर धरले. त्यात तीन लाख रुपये शिल्लक होते. १९७६ साली इतकी रक्कम पुरेशी होती. शिवाय त्याच्याकडे रोख रक्कम होती. एकंदर जगनची बचतीची वृत्ती, काम करण्यातली चिकाटी आणि निर्व्यसनी स्वभाव लक्षात घेऊन मी थोडेसे धाडसच करून या कर्जासाठी वरिष्ठ कार्यालयातून मंजुरी मिळवली. एका शुभमुहूर्तावर 'जगन' शिंदेचा टेम्पो गावात आला. जगनची २-२।। वर्षांतली ही प्रगती पाहून काहींना आनंद झाला. तर खेडेगावातील नेहमीच एक आढळणारी वृत्ती म्हणजे दुसऱ्याच्या उन्नतीला नावे ठेवणे, पाय ओढणे, माझ्या काही चांगल्या खातेदारांनीही मी धोका पत्करलाय हे सांगायला कमी केले नाही. पण माझा स्वतः वर विश्वास होता. जगनची कमाई, खर्च आणि बँकेत येणारे पैसे यावर बारीक लक्ष होते. आठवडी बाजाराच्या दिवशी आणि जवळच असलेल्या तालुक्याच्या बाजारादिवशी जगनचा टेम्पो चांगलाच व्यवसाय करत होता. माझ्या बँकेतील इतर कर्मचाऱ्यांनाही मी जगनच्या व्यवसायावर लक्ष ठेवण्यास सांगितले होते. त्यामुळे तशाही गावात व आजूबाजूला घडणाऱ्या सगळ्या घटना आपसातील पैसे व्यवहार, जमीन व्यवहार, भावकी हे माझ्यापर्यंत बरोबर पोचत असे. कर्ज खात्यावर हप्ते वेळेवर येत. व्याज भरले जात होते. एकेदिवशी माझ्या स्टाफने सांगितले, 'साहेब जगनच्या वडिलांनी दोन एकर जमीन विकत घेतली आहे.' मी बरं म्हटलं. आणखी सहा महिने निघून गेले. टेम्पोचे कर्ज आता वेगाने फिटत होते. जगन हप्त्यापेक्षा जास्त रक्कम भरत होता.

पुन्हा एकदा एकेदिवशी संध्याकाळी जगन माझ्याकडे आला. माझ्या एक-दोन कर्मचाऱ्यांनी 'काय जगनशेठ म्हणून त्यांना आवाज दिला मी ओळखले की जगन शिंदे आता मालदार होऊ लागले आहेत,' मी पण काय जगनशेठ काय काम काढलं' असे विचारताच तो गांगरला. 'साहेब पुन्हा एक महत्त्वाचे काम आहे, पुन्हा कर्ज पाहिजे - जगन. 'अरे पण आता नवीन काय!' मी जरा चिडूनच. 'साहेब शेजारच्या गावातील एक ट्रक-जुना ट्रक विकायचा आहे. तो भावाला घेऊन देतो.' मला फक्त दहा लाख रुपये कर्ज द्या. 'अरे पण तुझे टेम्पोचे कर्ज अद्याप फिटलेले नाही- मी साहेब टेम्पोचे हप्ते वेळेवर व जास्त भरतोय, कर्ज निम्म्यापेक्षा जास्त फिटलंय. या वर्षात ते पूर्ण करतो. पण एवढे काम करा - जगन

जगन निघून गेल्यावर मी बराच वेळ विचार करत होतो. नेमके काय करावे. कारण शिंदे फॅमिलीचे सगळे दिवसच बदलले होते. जगनला प्रत्येक नवीन व्यवसायात यश मिळत होते. पैशांतून तो नवीन गुंतवणूक करीत होता. नशीब त्याच्या कर्तृत्वाला साथ देत होतं. जगनने त्याच्या भावासाठी - म्हणजेच भावाच्या नावाने अर्ज केला होता. ट्रक सेकंडहॅण्ड होता. पण फार जुना नव्हता. २।। ते ३ वर्षांपूर्वीचा होता. त्याचे व्हॅल्युएशनही चांगले होते. जगनच्या भावाचे नाव होते भरत. त्याला ड्रायव्हिंगचा अनुभव होता. तो स्वतःच ट्रक चालविणार होता. एकंदर मागची सगळी पार्श्वभूमी व अनुभव लक्षात घेऊन मी भरतला ट्रकसाठी कर्ज दिले. शिंदेंचा ट्रकही गावात चर्चेचा विषय झाला. भरतने जवळच्या व मुंबई, पुणे, रत्नागिरीपर्यंतच्या ट्रक फेऱ्या सुरू केल्या. अर्थात कोल्हापूरपर्यंत गेल्यानंतरच बऱ्यापैकी धंदा ट्रकला मिळत होता. कोकण जवळ असल्याने तिकडचा धंदाही मिळत होता. थोडक्यात परिस्थिती बरी होती. पहिले सहा महिने ट्रकचे हप्ते वेळेवर येत होते. पुढे एक महिना ट्रकचा हप्ता आला नाही. दोन हप्ते थकताच मी भरतला भेटून ताबडतोब ट्रक कर्जाचे हप्ते भरायला सांगितले. पुढच्या सहा महिन्यांत कर्जाचे हप्ते व मासिक व्याज हे भरण्यात अंतर पडू लागले. मग एके दिवशी भरतला ट्रक घेऊनच बँकेत बोलावले पण तो आला नाही. जगनला विचारल्यावर ट्रक मुंबईला ड्रायव्हर देऊन पाठविल्याचे सांगितले. माझ्या स्टाफकडून कळत होते की, शिंदेंच्याकडून आणखी काही जमीन विकत घेतली आहे. याचा अर्थ पैसा कमावला जात होता. पण तो बँकेत येत नव्हता. पूर्वीप्रमाणे जगन हॉटेलवर दिसत नव्हता. बऱ्याच वेळेला हॉटेल नोकर माणसेच पाहत. थोडक्यात काहीतरी बिघडायला लागलंय याची मला जाणीव झाली. एकेदिवशी माझ्या स्टाफने मला सांगितले की, साहेब 'गेले पंधरा दिवस माझ्या नजरेस शिंदेंच्या घराजवळ व हॉटेलजवळ ट्रक दिसला नाही. अशी कुजबुज आहे की ट्रक त्यानी विकला.' हे ऐकून मला धक्काच बसला. मी ताबडतोब जगन आणि भरतला बँकेत बोलावणे पाठविले. पण माझ्या शिपायाला ते भेटलेच नाहीत. मी जरा अपसेटच झालो होतो. पण दुसऱ्या दिवशी संध्याकाळी जगन व भरत बँकेत आले. भरत कॅशियरकडे गेला व काही पैसे त्याने जमा केले. तो येताच मी सरळच विचारले, 'ट्रक कुठे आहे?'

थोडा वेळ ते दोघे काहीच बोलले नाहीत. मग जगन हळूच म्हणाला, 'ट्रकचे मोठे काम निघालेय, त्यामुळे वर्कशॉपला आहे.' मी म्हणालो, 'चला आपण वर्कशॉपला कोल्हापूरला जाऊ. मला आता खोटेपणाचा राग आला होता. मी स्पष्टच विचारले, 'तुम्ही ट्रक विकला आहे का?' यावर जगन म्हणाला, 'फलटणची एक पार्टी आहे, ते ट्रक विकत घेणार आहेत.

त्यांनी इसारा (ॲडव्हान्स) म्हणून दिलेल्यापैकी वीस हजार आता भरलेत. त्यांच्याकडून ॲडव्हान्स किती मिळाला - मी.

'त्यांच्याकडून सत्तर हजार मिळाले. उरलेले पन्नास हजार एके ठिकाणी देणे होते ते दिले.' मी ओळखलं की या भावांची वृत्ती बिघडली आहे. आतापर्यंत कष्टाला नशिबाची साथ होती. पण यांची नियत आता बिघडली आहे. हाव सुरू झाली आहे. तेव्हा नशिबाची साथ सुटणार. मी ताबडतोब कर्जाची सर्व रक्कम व्याजासह आठ दिवसांत भरा असे दोघांना स्पष्ट बजावले. दुसऱ्या दिवशी ते दोघे भाऊ फलटणच्या ज्या व्यक्तीला ट्रक विकला होता. त्यांना घेऊन आले व मलाच ही पार्टी चांगली आहे आता कर्ज यांच्या नावाने ट्रान्सफर करा म्हणून विनंती करू लागले. मी त्या तिघांना स्पष्ट सांगितले, ट्रकवर बँकेचा बोजा आहे. पूर्ण पैसे आठ दिवसात न आल्यास मी कायदेशीर कारवाई करीन. मला माझ्या स्टाफच्यामार्फत हे सुद्धा कळले की जगनजी जवळच्या दुसऱ्या म्हणजे नजीकच्या खेड्यातील दुसऱ्या बँकेत पैशांचे व्यवहार करत आहेत. तेव्हा अधिक वेळ न दवडता मी भरत शिंदे व जगन शिंदे यांना वकिलामार्फत नोटीस दिली. दरम्यान माझी बदली झाली आणि माझा या ब्रँचशी संबंध संपला. तथापि मी नंतर आलेल्या ब्रँच मॅनेजरशी संपर्क ठेवून होतो. त्याने पुढे सहा महिन्यांनंतर सांगितलेली हकिकत एकदम वेगळी होती. त्याच्या म्हणण्याप्रमाणे बँकेच्या लीगल नोटिशीनंतर पुढच्या कारवाईपूर्वी, ज्यांनी तो ट्रक विकत घेतला होता त्यांनी पूर्ण रक्कम भरून बँकेचे कर्ज खाते बंद केले. पुढे जगनच्या टेम्पोला अपघात झाला व खुद्द जगन त्यात जखमी झाला. हॉटेलकडे दुर्लक्ष झाल्याने गावात नवीन आलेल्या उडप्याने शिंदे रेस्टॉरंटचा धंदा संपवला. चौ रस्त्यावर असलेल्या या गावाची प्रगती होत होती. नवीन धंदे व्यवसाय सुरू होत होते. बँकेचा व्यवसाय वाढत होता. पण शिंदे बंधू जगन व भरत यांची मात्र अधोगती सुरू झाली होती. पुढे पैशाची आवक घटल्याने त्यांना हॉटेल विकावे लागले.

मला या अनुभवातून एवढेच जाणवले की प्रत्येक व्यक्तीला कष्टाबरोबर नशिबाची साथही मदत करते पण केवळ नशिबावर काही अवलंबून नाही. नशीब तर आहेच पण प्रामाणिकपणा व वागण्यात सच्चाई पाहिजे अन्यथा अधोगती निश्चित.

निशा लिमये - प्रशांतजी आज तुम्ही एक खरोखरच वास्तव अनुभव सांगून आमच्या प्रेक्षकांच्या समोर कोणत्याही व्यवसायांत, उद्योगांत व वैयक्तिक जीवनात केवळ नशिबाला चांगले किंवा वाईट म्हणून चालणार नाही. तर त्याचबरोबर कष्ट, प्रामाणिकपणा आणि सच्चेपणा हे तितकेच महत्त्वाचे आहेत. प्रशांतजी एझेड वाहिनीतर्फे तुम्हाला धन्यवाद.

प्रेक्षकहो पुढच्या शनिवारी पुन्हा भेटूया एक नवीन अनुभव ऐकण्यासाठी.

♦

---



## 'हितगुज' १००वा अंक बालगोपाळांसाठी
## पक्षी-प्राणीविषयक मनोरंजक माहिती



५०. वाघांचे उगमस्थान सायबेरिया आहे.
५१. प्राण्यात सर्वात जास्त आयुष्य कासवाला आहे.
५२. जगामध्ये पक्ष्यांच्या ८६५० जाती आहेत. त्यातील १२०० भारतात आहेत.
५३. एक घुबड ३० मांजरे जेवढे उंदीर मारतात तेवढे एकटे मारते त्यामुळे भारताच्या शेतीला ते महत्त्वाचे आहे.
५४. कोआला (छोटे अस्वल)चे पिल्लू जन्मतः एका द्राक्षाएवढेच मोठे असते. कोआला फक्त निलगिरीची पाने खाऊन जगतो.
५५. जगामध्ये माकडाच्या सुमारे १२५ जाती आहेत.
५६. पांडा दररोज ९ किलो (कोवळा) बांबू खातो.
५७. मृत समुद्रात खूप मीठ असल्याने मासे नाहीत.
५८. जगात सर्वात वेगाने उडणाऱ्या पक्ष्याचे नाव व्हाइट असे असून तो ताशी १५० किमी. वेगाने उडतो.
५९. गेंटू पेंग्विन हा सर्वात जलद पोहणारा असून तो ताशी २७ कि.मी. वेगाने पोहतो.
६०. ग्रे हाऊंड हा शिकारी कुत्रा फक्त ३ उड्यात ताशी ४५ मैल (७२ कि.मी.) वेग पकडतो.



**प्रेषक : श्री. मोहनराव मराठे (पृ. ३६५),** खार

# लेखनकला - एक प्रवास, एक स्थित्यंतर

• संजय रामचंद्र मराठे (पृ.४१६), अमरावती भ्रमणध्वनी : ८२३७९३३०६८

सर्वकाही नीट असूनही पेन उमटत नव्हते. विचारचक्र सुरू झाले. नुकताच २४ फेब्रुवारीला 'जागतिक मुद्रण दिन' संपन्न झाला. लेखन – मुद्रण प्रपंचाचा एक एक पदर मनात उलगडू लागला.

मातेच्या गर्भातील हुंकार मातेला ऐकू येऊ लागला, ह्या मुळ स्रोतातून संवाद प्रक्रिया उगम पावली असावी. हुंकार स्पंदनांना क्रिया आणि हालचालीची जोड मिळून संवादाचे क्षितिज रूंदावायला सुरुवात झाली असावी. मानव उत्क्रांत होऊ लागला तसतसे हावभाव, खाणाखुणा, शब्द, इशारे अशी संवाद प्रक्रिया उत्क्रांत होत गेली असावी. मानवाचे सुसंस्कृत माणसात परिवर्तन झाले, तसे संवाद प्रक्रियेची माध्यमेही विकसित होऊ लागली. वेदकालीन संस्कृती, अध्यात्म, शास्त्र जतन करण्यासाठी पाठांतर आणि त्यासाठी दीक्षापद्धती आणि त्याची विविध अंगे कालपरत्वे व गरजेनुसार विकसित होत गेली असावीत. माणसाचा बहुमुखी, बहुदिशांना विकास होत गेला. त्याच्या स्मृतीची व्याप्ती आणि मर्यादा जशी विकसित होऊ लागली तशी स्मृतीवर साठवल्या जाणाऱ्या विविधांगी, विविधरूपी आणि बहुपर्यायी संवेगाची वाढही चक्रवाढ आणि गुणाकार पद्धतीने वृद्धिंगत आणि विकसित होऊ लागली. स्मृतिपटलाव्यतिरिक्त किंवा त्याला पूरक म्हणून आणखी एका पटलाची गरज निर्माण झाली. वेदवाङ्मय स्मृतिपटलावरून मुखोद्गत पद्धतीने पुढे हस्तांतरित करण्यासाठी सक्षम असे मनुष्यबळ मिळेलच याची खात्री कमी कमी होत गेली. शिवाय वेदवाङ्मयाव्यतिरिक्त इतरही अनेक बाबी आणि वेदकालीन ज्ञान, विज्ञान पडताळून पाहण्यासाठी त्याला स्थिरत्व आणि स्थायित्व देणे गरजेचे झाले. वेदोत्तर काळात यांच्या शोध आणि बोधाच्या कक्षा रुंदायला लागल्या. मग सुरू झाले लेखन – मुद्रण कलेची उत्क्रांती आणि स्थित्यंतरे.

वेदोत्तर काळातील ऋचा, उपनिषदे, सुक्तेपासून पौराणिक वाङ्मयाच्या नोंदी, पुरेशा स्पष्ट पण सर्वसामान्यांना गूढ अशा आणि संस्कृत मग पाली, प्राकृत नंतर तत्कालीन लिपीच्या माध्यमातून, भूर्जपत्रावर साकारल्या गेलेल्या या वाङ्मयांनी पुढे पोथ्या आणि पुराणांच्या रूपात कागदाचा शोध लागल्यावर त्यावर स्थान मिळवले.

राजाज्ञा, हुकूम, संदेश आणि प्रजाहित कार्य यांच्यासाठी मग शिलालेख, शिलास्तंभ उभारून ते चिरस्थायी होऊ लागले. मानसन्मान आणि सत्कारासाठी ताम्रपत्र आणि इतर धातूंच्या पत्रांचा वापर केला जाऊ लागला. सुवर्णाक्षरात लिहून ठेवावे हा वाक्प्रचार याच कालावधीतील असावा. काळ्या दगडावरची रेघ हा वाक्प्रचार शिलालेखांच्या कालखंडातील असावा.

नंतरच्या काळात कागद आणि शाईचा शोध लागला. हँडमेड पेपरपासून आयव्हरी बाँडपर्यंत विविध ब्रँडचे पेपर अस्तित्वात आले. एक पैशाच्या शाईच्या पुडी आणि गोळीपासून कॅमल ब्रँड आणि विविध प्रकारच्या शाई उत्क्रांत झाल्या. आता अगदी गोल्डन लेटर्स एंबॉस करता येऊ लागलेत. तेच पेनबाबत. शाईत बोट बुडवून तरटी (कॅनव्हास) किंवा पृष्ठाच्या लेखन सामग्रीने आता बोरू ते पारकर पेनपर्यंत विकास केला आहे. मी स्वतः बोरू वापरला, बोटक्या निफेचा टाक वापरला, चार आण्याच्या कांडीच्या डाँट पेनपासून आमच्या जमान्यातील सर्वात महाग पारकरचा पेनही वापरला आहे.

लेखनकलेला स्थिरता देणारी पहिली मोठी क्रांती छपाई यंत्राने घडवून आणली. 'दै. हिंदुस्थान'साठी नव्या नवलाईचे नवीन छपाई यंत्र कै. ती. डॉ. अरुणदादांनी दिल्लीहून आणले. आणि त्याच्यासाठीची मोटर अमरावतीमधील त्यांच्या मित्राकडून बनवून घेतली. खिळे जोडणी, प्लेट तयार करणे, प्लेट रोटा मशिनवर चढवणे, प्रूफ प्रिंट काढणे, प्रूफ चेक करणे, प्लेटमधील शिश्याची अक्षरे चिमट्याने उचकटून काढणे, नवीन अक्षरे, काना, मात्रा, उकार, वेलांटी यांची दुरुस्ती करून फायनल प्लेट मशिनवर चढवणे. मुद्रण कलेचा हा सर्व इतिहास दादांनी मला केवळ सांगितलाच नाही तर प्रात्यक्षिकासह करून दाखवला आहे. खूप दिवसांपूर्वी हे बघितले आहे, तपशिलात काही चूकभूल झाली असेल तर माफ करावे.

मुद्रण कलेचे आणि साधन सामग्रीचे स्वरूप आता एकदम बदललेले आहे. नवनवीन साधने आणि तंत्रे आली आहेत. कोणीही पीसी किंवा लॅपटॉप तर राहूच द्या, मोबाइलवर सुद्धा काहीही, केव्हाही टाइप करायचे, सॉरी आता टाइपही करायची गरज नाही फक्त बोलायचे, आपोआप स्क्रीनवर उमटतं, गरज असल्यास त्यातच दुरुस्ती करायची आणि समाधान झाले की

सेंड करायचे. लगेचच ते तसेच्या तसे जिथे छापले जायचे आहे तिथे पोहोचते तेही छापण्यासाठी तयार असलेल्या पेजवर. आणि एकाच कमांडवर लाखो प्रती काही मिनिटांत छापून तयार. आतातर छापलेले कायम ठेवण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि विविध साधने उपलब्ध आहेत. छापील प्रत, हार्डकॉपीही ठेवायची गरज नाही. सर्व सॉफ्ट कॉपी आणि संगणकात कितीही काळ राहू शकतं.

जरी सर्व पेपरलेस झाले तरी लेखन, मुद्रण, लिखित, छापील यांची गरज आणि महत्त्व कमी होऊच शकत नाही. सर्वच पेपरलेस करणे हा निश्चितच पर्याय होऊ शकणार नाही. पेपरलेस करन्सीने रुपयांचे डॉलरच्या तुलनेत मूल्य वाढणार आहे का? असो तो वेगळा विषय आहे.

अशा ह्या जागतिक मुद्रण कलेला जागतिक मुद्रण दिनाच्या निमित्ताने मानाचा मुजरा. ही कला जोपासणाऱ्या आणि राबवणाऱ्या जगभरातील लाखो हातांना कोटी कोटी प्रणाम.

♦

---

# माझी कर्ण कहाणी

♦ श्रीमती रोहिणी मराठे (पृ. २८८), पुणे भ्रमणध्वनी : ८९७५९६९८८५

**का**ही वर्षांपूर्वी माझी ऐकण्याची क्षमता हळूहळू कमी झालेली वाटली. तसे म्हटले तर कान फुटून वाहणे, कानाचा पडदा फाटणे इत्यादी काही त्रास नव्हता मग मला का ऐकू येत नाही असे वाटले. आणि मनात विचारचक्र सुरू झाले. श्रवणशक्ती कमी झाली तर मला व्याख्यानमाला, भजन, कीर्तन इत्यादी ऐकता येणार नाही. तसेच गाणी, टीव्हीवरचे कार्यक्रम ऐकता येणार नाही, अशी यादी केली तर ऐकण्याच्या खूपच गोष्टी आहेत. मनात विचार येई, आपण जीवनात ऐकण्याचा आस्वाद पुन्हा घेऊ शकू का? शरीराचा प्रत्येक अवयव किती महत्त्वाचा आहे याची जाणीव झाली, असे का होईल असे मला वाटले नव्हते. कारण लहानपणापासून कानाचा त्रास काहीच नव्हता. पण पुढे होणार नाही याची खात्री देता येत नाही. हे खरेच आहे.



उर्वरित आयुष्य श्रवणाविना काढायचं या विचाराने मन आणि डोळे भरून आले. वाटले जगातल्या सुंदर आनंददायक शब्दांना म्हणजे सुंदर अनुभवांना आपण पारखे होणार! ईश्वराने सर्व काही दिले, आता ऐहिक काही मागण्यासारखे उरले नाही. असे म्हणता म्हणता मन ईश्वरापाशी नतमस्तक होऊन जाई अन् एकच मागणं पुढे येई 'देवा शेवटपर्यंत सर्व इंद्रिये कार्यरत ठेव' श्रवणशक्ती नष्ट होणं ही गोष्ट भयंकर असते. आजूबाजूचे लोक ऐकू येत नाही म्हणून कुचेष्टा करतात. इतर कुठलेही अवयव क्षीण झाले तर लोकांना सहानुभूती, हळहळ वाटते. पण कान गेले तर लोक त्याची खिल्ली उडवतात. कुटुंबापासून, समाजापासून आपण लांब चाललो आहोत, एकाकी आहोत, जगून तरी काय करायचं? असे विचार येतात.

मनातून अपराधी वाटते. असे विचार करत असताना एके दिवशी हे म्हणाले (विजय मराठे) काळजी कशाला करतेस आपण डॉक्टरांना दाखवू. मग आम्ही ईएनटी स्पेशालिस्ट डॉ. घैसास यांच्याकडे गेलो. डॉक्टर म्हणाले, ''ऑपरेशन केले तर ऐकू येऊ शकेल.'' दोन्ही कानांचे ऑपरेशन करावे लागणार होते. प्रथम उजव्या कानाचे ऑपरेशन केले. त्यानंतर आठ-दहा दिवसांनी चांगले ऐकू येऊ लागले. दुसऱ्या कानाचे ऑपरेशन मात्र काही घरगुती अडचणींमुळे करायचे राहिले. ज्या कानाचे ऑपरेशन झाले होते त्या कानाने पुढे सात-आठ वर्षे चांगले ऐकू येत होते. पण त्यानंतर त्याची ऐकण्याची क्षमता कमी झाली. मग पुन्हा प्रश्न पडला की, आता काय करायचे. पुन्हा डॉक्टरांकडे गेलो. ते म्हणाले, ''आता ऑपरेशन करण्याची कानाची स्थिती राहिलेली नाही. तेव्हा तुम्हाला श्रवणयंत्र वापरावे लागेल.'' नंतर आम्ही डॉ. घैसास यांनी सुचविलेले दांडेकर हिअरिंग सर्व्हिसेसमध्ये गेलो. तेथे माझ्या कानाला योग्य असे श्रवणयंत्र मिळाले आणि माझी ऐकण्याची समस्या दूर झाली. आता मी ऐकण्याचा आनंद पुरेपूर घेऊ शकते. या निमित्ताने मी तुम्हाला सांगू इच्छिते की, ''ज्यांना कमी ऐकू येते त्यांनी अवश्य दांडेकर हिअरिंग सर्व्हिसेसमध्ये जाऊन तेथील श्रवणयंत्र खरेदी करावे. तुम्हाला नक्कीच चांगला अनुभव येईल.'' मात्र इतर लोकांना सांगावेसे वाटते की, ''कुणाच्याही शारीरिक उणिवेवर मग ती कायमची असो वा तात्पुरती कृपया त्यांना हसू नका. त्यांची चेष्टा करू नका.''

♦

# श्रीकृष्णदयार्णव (शके १५९६-१६६२)

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी - ०२२ २४१५०८८९

**कृ**ष्णदयार्णवांचे मूळ गाव कोपारूढ म्हणजे आजचे कोपर्डे हे होय. त्यांच्या पित्याचे नाव नारायण असून मातेचे नाव बहिणाबाई असे होते. या बहिणाबाईने संतानप्राप्तीसाठी अश्वत्थसेवेचे व्रत स्वीकारून ईश्वराराधनेत एक तप घालविल्यानंतर तिला जनार्दन नावाचा पुत्र झाला; त्याच्या पाठीवर काही दिवसांनी नरहर नावाचा दुसरा पुत्र झाला. हाच पुढे ''कृष्णदयार्णव'' या नावाने लोकात प्रसिद्ध झाला. यांचा जन्मशक १५९६; आनंद संवत्सर, वैशाख शुद्ध तृतीयेस, म्हणजे अक्षय्यतृतीयेस हे जन्मले. ह्याच आनंद संवत्सरी श्रीशिवरायांचाही राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला होता, हा योगायोग मोठा अपूर्व दिसतो.

शके १६०४ मध्ये नरहरीचे लग्न झाले. श्रीशिवाजी राजे निवर्तल्यावर महाराष्ट्रावर मोठी आपत्ती कोसळली! महाराष्ट्रात सर्वत्र अराजक माजले; औरंगजेबाच्या सैन्याने मोठा उच्छाद मांडला! अनेकजणांना स्थलांतर करावे लागले! नरहरीलाही ग्रामत्याग करावा लागला. स्वत: कृष्णदयार्णव म्हणतात :

*शिवभूपति पावता मुक्ति। दक्षिणे येवोनी ताम्रपती।*
*केली विजयपुरा समाप्ती। महाविपत्ती राष्ट्रातें।।३२।।*
*मग सोडूनि कृष्णातीर। भ्रमतां कालचक्रानुसार।*
*आश्रयुनि ठेलों अंबापूर। सहपरिवार साग्रज।।३३।।*

अ.१ला, हरिवरदा

याच ठिकाणी नरहरीला सद्‌गुरू श्री गोविंदांकडून गुरुपदेश लाभला आणि त्यास कृष्णोपासनेची दीक्षा प्राप्त झाली. यासंबंधी कृष्णदयार्णव म्हणतात :

*तेथ युवाब्दीं करुणासिंधु। भेटला सद्‌गुरू श्रीगोविंदु।*
*श्रावण वद्याष्टमीस वरदु। कृष्णोपासना निरुपिलें।।३४।।*

अ.१ला, हरिवरदा

शके १६१७ मध्ये हा प्रसंग घडला. हा कृष्णजन्माष्टमीचा सुमुहूर्त होता. श्रीगोविंद हे आनंद संप्रदायी होते. त्यांनी नरहरीला,

*करूनि निरपेक्ष कोरान्न। कृष्णदयार्णव नामस्मरण।*
*स्नानसंध्या गीतापठण। पारायण ज्ञानेश्वरी।।३८।।*

अ.१ला, तत्तैव

असा नित्यनेम सांगितला - नरहरी कोरान्न भिक्षा मागताना मुखाने ''कृष्णदयार्णव'' नामाचा गजर करी; म्हणून लोकं त्याला कृष्णदयार्णव असेच म्हणू लागले.

**हरिवरदा रचण्याचे कारण :**

कृष्णदयार्णवांची प्रथम पत्नी निवर्तल्यावर, गुर्वाज्ञेनुसार त्यांनी द्वितीय विवाह केला. पहिल्या पत्नीपासून त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली होती. द्वितीय विवाहानंतर त्यांना सहा-सात वर्षांनंतर रक्तपित्तीची बाधा झाली. त्यावर संत एकनाथांनी स्वप्न दृष्टांत देऊन श्रीमद्‌भागवतानुसार लेखन करावयास सांगितले; त्यास त्यांचे सद्‌गुरू श्रीगोविंदस्वामींनीही अनुमती दर्शविली. म्हणून वयाच्या ५४ व्या वर्षी कृष्णदयार्णवांनी, श्रीमद्‌भागवताच्या दशमस्कंधावर आपली सुप्रसिद्ध टीका 'हरिवरदा' रचिण्यास प्रारंभ केला. संत एकनाथांप्रमाणे कृष्णदयार्णवांनीही श्रीधरी टीकेच्या आधारे आपली टीका रचिली आहे.

**हरिवरदाची ओळख :**

हरिवरदा ग्रंथाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग असून पूर्वार्ध ४९ अध्यायांचा आहे. पूर्वार्ध संपला तेव्हा कृष्णदयार्णवांनी साठी ओलांडली होती आणि त्यांचा रोगही नष्ट झाला होता. कृष्णदयार्णवांनी शके १६५६ मध्ये या टीकेचा उत्तरार्ध लिहिण्यास प्रारंभ केला, आणि त्याचे ३७ अध्याय लिहून झाले व तद्‌नंतर शके १६६२ मध्ये रौद्रनाम संवत्सरी मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस गुरुवारी श्रीक्षेत्र पैठण येथे ते समाधिस्त झाले. आपला ग्रंथ पुरा होत नाही याची कल्पना कृष्णदयार्णवांना मृत्यूपूर्वीच आली होती. म्हणून त्यांनी आपला शिष्य 'उत्तमश्लोक' यास उरलेला ग्रंथ पूर्ण करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे पुढील राहिलेले तीन-साडेतीन अध्याय लिहून उत्तमश्लोकांनी आपल्या गुरूचा हा ग्रंथ शके १६६५ मध्ये पूर्ण केला.

हरिवरदा टीकेच्या प्रारंभी एका संस्कृत श्लोकामधून कृष्णदयार्णवांनी आपली गुरूपरंपरा कथन केली आहे. ते म्हणतात :

*हरिं विधिं नारदं च दत्तात्रेयं जनार्दनम्।*
*एकनाथं चिदानंदं स्वानंदानंदवर्धनम्।*
*गोविंद सद्‌गुरूं वंदे श्रीमत्कृष्णदयार्णवम्।।३।।* अध्याय १

ही परंपरा अशी आहे=हरि→विधि→नारद→दत्तात्रेय→जनार्दन →एकनाथ→चिदानंद→स्वानंद→गोविंद आणि श्रीकृष्णदयार्णव.

या परंपरेवर दृष्टिक्षेप टाकताच एक गोष्ट चटकन लक्षात येते, ती म्हणजे या परंपरेचा दत्तोपासनेशी घनिष्ट संबंध आहे. दत्तात्रेय, जनार्दन, एकनाथ यांचा एकमेकांशी घनिष्ट संबंधच स्पष्ट होतो. जनार्दन व एकनाथ यांची दत्तपर रचनाही आहे; तिचाही परिचय पूर्वी करून दिला आहे. श्रीमद्‌भागवतपर रचनेत जशी एकनाथांची एकादशस्कंधावरील टीका प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणे कृष्णदयार्णवांची दशमस्कंधावरील ‘हरिवरदा’ टीका सुप्रसिद्ध आहे. एकनाथांची कृष्णपर रचनाच विपुल असली तरी दत्तावरही, अत्यल्प का होईना, त्यांची रचना आढळते तसाच काहीसा प्रकार कृष्णदयार्णवांबद्दलसुद्धा आढळतो. त्यांचे आयुष्य प्रामुख्याने ‘हरिवरदा’ टीका रचिण्यात गेले असल्यामुळे त्यांची दत्तपर स्वतंत्र रचना आढळत नसली तरी दत्तपर अनेक उल्लेख मला त्यांनी केलेले आढळतात.

धर्मस्थापनेसाठी, दुष्कृत्यांचे निवारण करण्यासाठी परमेश्वराने नाना अवतार घेतले. या संदर्भात हरिवरदात उल्लेख करताना कृष्णदयार्णव म्हणतात :

*कपिल दत्तात्रेय वामन। याज्ञवल्क्य द्वैपायन।*
*भृगु नारद नारायण। इत्यादी पूर्ण ऋषींमाजी।।४०१।।*

अ.१४, हरिवरदा.

येथे कृष्णदयार्णवांनी दत्तात्रेयाला ऋषीत गणले आहे हे विशेष होय.

१९वा अध्याय समाप्त करताना त्यांनी म्हटले आहे,

*आदिगुरू दत्तात्रेय। जनार्दनासी दाविली सोय।*
*एकनाथे तदन्वयें। चिदानंदी प्रकटिली।।१५७।।*

अ.१९, हरिवरदा.

येथे त्यांनी दत्तात्रेयांविषयी आपला पूज्यभाव प्रकट केलेला आहे.

२३व्या अध्यायाचा समारोप करताना एका रूपकाद्वारे त्यांनी म्हटले आहे :

*आदिगुरू ईश्वरमूर्ति। मनीषा दत्तात्रेय सुमति।*
*जनार्दन उदानवृत्ति। एकनाथ तश्चक्षु।।५०७।।*

अ.२३, हरिवरदा.

श्रीमद्‌भागवतामध्ये वर्णिलेल्या श्रीकृष्णाच्या अनेक लीला काही टीकाकारांना विकृताचरणी वाटत होत्या. म्हणून श्रीव्यासांनी त्यांचे समर्थन एका श्लोकात करताना म्हटले आहे (दशम स्कंद) :

*धर्मव्यतिक्रमो दृष्ट ईश्वराणां च साहसम्।*
*तेजीयसां न दोषाय वह्नेः सर्वभुजो यथा।।*३०।। अ. ३३

विवाहित गोपींच्यासह श्रीकृष्णाने ज्या क्रीडा केल्या त्याबद्दल आक्षेप घेतला जात होता आणि त्याचेच समर्थन श्रीव्यासांनी वरील श्लोकात केलेले आहे.

परंतु या श्लोकावर भाष्य करताना कृष्णदयार्णवांनी दत्तात्रेयाच्या उन्मत्तपणाचेसुद्धा समर्थन केलेले आढळते. ते म्हणतात :

*पाहोनि कृष्णाचें आचरण। येर जैं आचरती सामान्य।*
*तै त्यांलागी अध:पतन। हें निमित्त देशी कृष्णातें।।३४७।।*
*तरी येथींचा ऐसा अर्थ। राया अवधारी यथार्थ।*
*ईश्वराचरणाचा जो पंथ। तो दे अनर्थ अनीश्वरां।।३४८।।*
*कृष्ण परब्रह्म साचार। जो ईश्वरांचा ईश्वर।*
*मायानियंता जगदाधार। अगाध अपार ऐश्वर्यें।।३४९।।*
*असो कृष्णाचें आचरण। परी सामान्य जे जे तपोधन।*
*ज्यांची क्रिया असाधारण। केवीं सामान्य आचरती।।३५०।।*
*इंद्रे ब्रह्मघ्न वधिला वृत्र। घटनें सागर केला मूत्र।*
*वशिष्ठाचे शतैक पुत्र। विश्वामित्र संहरवी।।३५१।।*
*ब्रह्मयाचे कन्यागमन। शंकराचे विषभक्षण।*
*दत्तात्रेयाचें उन्मत्तपण। इतर कोण करूं शके।।३५२।।*

अ.३३, हरिवरदा.

याठिकाणी कृष्णदयार्णव श्रीदत्तात्रेयांकडे एक अलौकिक विभूती म्हणूनच पाहताना आढळतात. कारण दत्तात्रेयांच्या उन्मत्त आचरणाची, म्हणजेच मार्कण्डेय पुराणात वर्णिलेल्या विकृताचरणाची तुलना ते इंद्र, विश्वामित्र, ब्रह्मा, शंकर यांच्या कृत्यांशी करताना आढळतात!

आणखीही एक विशेष त्यांच्या वर्णनात जाणवतो तो म्हणजे कृष्णदयार्णवांचा दत्त, एकमुखी, द्विभुजी दिसतो; याचे कारण त्यांची रचना भागवताश्रयी असून तेथे दत्तात्रेयाचे उल्लेख ‘एकमुखी द्विभुजी’च येताना आढळतात, दत्तात्रेयाचे त्रिमुखी षड्भुज स्वरूप भागवतकारांनी कोठेही वर्णिलेले आढळत नाही.

♦

## हसरे हितगुज



### कामाची वाटणी

सरलाबाई छान हसतमुख, आणि तिचा नवरा मात्र रडवेला, आंबलेली आमटी खाल्ल्यागत चेहऱ्याचा. तिच्या मैत्रिणीनं एकदा विचारलं, ‘कसं ग जमतं तुमचं? कधी एकत्र कुठं गेलात तर मज्जाच की!!’ पण हा काय प्रश्न झाला? तिची मैत्रीण म्हणाली, ‘अगं आम्ही कामं वाटून घेतलीत. कुठं लग्नाकार्याला जायचं, तर मी जाते. आणि कुणाच्या सांत्वनाला, आजाऱ्याला भेटायला जायचं तर मग हे जातात!’

# एका साधकाची उद्योगगाथा

• पं. वसंतराव गाडगीळ, पुणे

**कराचीचे मराठी उद्योगपती अप्पासाहेब मराठे**

आजच्या मुंबई महानगरीत प्रभादेवीच्या 'श्रीसिद्धिविनायक'जवळ 'मराठे उद्योग भवन' ही भव्य वास्तू अप्पासाहेब मराठे मार्गावर उभी आहे. त्याचे मूळ जनक हे वेंगुर्ला (सिंधुदुर्ग) भटवाडीचे मूळ घराणे असणारे 'मराठे'. आता पाकिस्तानात असणाऱ्या कराची महानगरीत औद्योगिक धडाडीच्या कर्तृत्वाने अधिकारपद प्राप्त झालेले श्री. सखाराम पुरुषोत्तम तथा अप्पासाहेब मराठे हे नामवंत उद्योगपती होते.

१९४४ ऑगस्टमध्ये मी स्वतःचे नशीब घडविण्यासाठी कोल्हापूर सोडून कराची (सिंध) गाठली. तेव्हा तेथील महाराष्ट्रीय समाजात अतिशय आदराने, अभिमानाने, आपुलकीच्या प्रेमाने ज्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाई ते होते कराचीच्या उद्योगविश्वाचे भूषण श्री. अप्पासाहेब मराठे. हे जन्माने कोकण प्रांतातील वेंगुर्लेकर. तिथेच ब्राह्मण पुरोहितांची बहुसंख्येने वस्ती असणाऱ्या भटवाडी भागात भिक्षुकी करीत उदरनिर्वाह करणाऱ्या घराण्यात यांचा जन्म १८ जून १९११ ला झाला. वयाच्या अठराव्या वर्षी, नोकरी व्यवसाय शोधण्यासाठी त्यांनी वेंगुर्ला मुंबई बोटीने, त्यावेळच्या सिंध-गुजरात सह अतिविशाल मुंबई प्रांताची राजधानी मुंबई गाठली. १८ वर्षे वयाचा सखाराम मराठे हा भटवाडीतला एक होतकरू तरुण प्रथम २४ तासांचा प्रवास करीत मुंबईत आला! पहिले १० महिने रेल्वेत लहानशी नोकरी गावली. मग नोकरी 'पी. शहा आणि कंपनी' यांच्याकडे. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, विलक्षण शिकण्याची हौस आणि सतत अविश्रांत परिश्रम या सद्‌गुणांच्या जोरावर केवळ पाचच वर्षांत 'पी. शहा आणि कंपनी' या उद्योगाचे मॅनेजरपद त्यांनी प्राप्त केले. घर सोडून मुंबई गाठल्यानंतरच्या सातव्याच वर्षी, १९३६ साली कंपनीचे मॅनेजर म्हणून कराची ऑफिसची जबाबदारी सांभाळण्यासाठी बोटीने ३ रात्री प्रवास करून हा मूळचा वेंगुर्लेकर तरुण पोहोचला 'कराची' महानगरीत.

एके काळचा सखाराम मराठे हा भटवाडी वेंगुर्ला येथील तरुण, आपले आणि कराची महानगरीचे वैभव वाढवीत, १२ वर्षे ठाम उभा होता. स्वतः स्थिरपद तर झालाच परंतु आमच्यासारख्या असंख्य बालांना, तरुणांना कोकणातून थेट कराचीला नेऊन त्यांचेही नशीब झळकावून उजळवणारा ठरला.

बारा वर्षे कराचीत 'पी. शहा आणि कंपनी' सांभाळतानाच 'सखाराम मराठे'चा अप्पासाहेब झाला. या उद्योगी तरुणाने स्वतःचा 'शॉर्कलिव्हर' ऑइल हा नवीन उद्योग सुरू केला. कराची हे बंदर आणि तेथील सागरतीर ही या मत्स्यमूल उद्योगाची खाण होती. बारा वर्षांत या उद्योगांची भरभराट चालू असताना तिथे स्थिरपद झालेले विशाल परंतु सात्त्विक, सोज्वळ, हसतमुख, प्रसन्नचित्त कुटुंब हा कराचीच्या मराठी समाजाचा फार मोठा आधार होता. सुरेश या त्यांच्या चिरंजीवाचा गायत्री – संस्कारदेखील कराचीतील माझ्या वास्तव्यात घडला होता.

चि. सुरेशच्या मुंजीवरून कराचीत अनुभवलेली ही आठवण. उभ्या कराची नगरीच्या महाराष्ट्रीय समाजाला घरोघर धार्मिक पौरोहित्य करायला एकच वयोवृद्ध गुरुजी उपलब्ध होता. त्याचे नाव होते सावळा भट. त्याचे भटपणाचे भांडवल होते फक्त रामरक्षा. लग्नकार्य मंगल असो वा श्राद्धपक्ष, सावळा भट रामरक्षा म्हणत सर्वच्या सर्व धर्मकृत्य पार पाडीत असे. त्यांच्या हाताला अकस्मात सापडला कोल्हापूरहून नशीब काढण्यासाठी पाठशाळा शिक्षण गुरुकुलपद्धतीने शिकून आलेला गाडगीळांचा वसंता, म्हणजे मी!

सावळा भटजींना आपले काम सुफळ संपन्न करायला आयता एक तरुण 'वसंता' गावला आणि ते आपल्या यजमान घरी सांगू लागले, ''माझा एक तयार वेदपाठी छात्र बटू मी कराचीत आणला आहे. हुशार आहे. खणखणीत आहे. मी आता थकलोय. माझ्या जागी गाडगीळ वसंताला पाठवतोय. त्याच्याकडून घ्या सगळे काम करून! मी तिथे प्रत्यक्ष नसलो तरी मनाने आहेच ना?'' आणि माझ्या वाट्याला कोल्हापूरसारखेच पुनश्च 'सहस्रशीर्षा...। हिरण्यवर्णम्...। ॐ नमस्ते गणपतये...। इडा देवहू... सारे पाठपाठांतर म्हणीत घरोघर जाणे आलेच.

कराची बंदरात पोर्ट ट्रस्टचे सारे सर्वप्रांतीय सेवक थाटामाटाची, महावैभवी, मणभर प्रसादाची 'सत्यनारायण महापूजा' लाखानी वर्गणी जमवून करायचे. अशा ठिकाणी पौरोहित्याचा बहुमान आणि 'बहुदेयं-चास्तु।'

...आज विदेशी जाऊन पौरोहित्य करणारा, घसघशीत दक्षिणा यांचा मानकरी ठरला, तो कोल्हापूरहून कराची गाठलेला गाडगीळ वसंताच!!

मराठा हायस्कूलमध्ये शिकत असतानाच सावळा भटजींनी लादलेले घसघशीत मानधन मिळवून देणारे वडिलोपार्जित पौरोहित्य हा मला 'कराची'त स्वकष्टार्जित मिळकतीचा एक आधार होता.

बारा वर्षे कराचीत नुसते राहून नव्हे स्वतःच्या उद्योगधंद्याचा 'श्रीगणेशा' करीत प्रचंड उद्योगसाम्राज्य उभारलेले अप्पासाहेब मराठे १२ वर्षे राबराब राबले. फाळणीमुळे कराचीचा – पाकिस्तान झाल्यामुळे १९४८ जानेवारीत (फाळणीनंतर ५–६ महिन्यांतच) सगळा धंदा फुंकून टाकून, पाकच्या निर्मितीनंतर पाच महिने राहून, व्यवसायासाठी ज्यांचे ज्यांचे पैसे घेतले होते, त्याची पूर्ण परतफेड करून त्यासाठी सर्वांची वाहवा मिळवून – पुनश्च आले, ते महामुंबईत 'श्रीगणेशा' करायला.

जानेवारी १९४८ ते २८–०८–१९६९ अखेर रात्रंदिवस पुनश्च राबराब राबून या महापुरुषाने महामुंबईत मराठे उद्योग भवन ही प्रासादतुल्य वास्तू उभारून सचिन आणि कंपनी, स्विफ्ट्स प्रा. लि. (टेबल टॉप ऑफसेट) अल्फा इलेक्ट्रिकल्स मशिन पार्ट्स, सी.लॅम्प्स इ. उद्योगांचे महाविश्व भरभक्कम खडे करून आपले सुपुत्र श्री. सुरेश मराठे आणि जामात थोर तंत्रज्ञ, क्वालिटी ऑफ प्रिंटिंग मशिन्स निर्माते श्री. नारायणराव केळकर यांच्यावर सर्व भार सोपवून २८–०८–६९ रोजी वयाच्या ५८व्या वर्षी जगाचा निरोप घेतला.

।। नमः शान्ताय तेजसे ।।

♦

---

# स्वर आले दुरुनी...

♦ श्री. गुरुनाथ मराठे (पृ. ४०८), बोरिवली, मुंबई

सुप्रसिद्ध कवी, गायक, गीतकार आणि संगीतकार यशवंत देव यांचा जन्म १ नोव्हेंबर, १९२६ रोजी झाला. त्यांच्या घरात वडिलांच्या रूपातच गाणं होतं. तेच त्यांचे पहिले गुरू होते. त्यांचे वडील विविध वाद्य वाजवायचे. थोडक्यात संगीताचं बाळकडू यशवंत देव यांना घरातूनच मिळालं. जी.एन. जोशी आणि गजाननराव वाटवे यांच्या शब्दप्रधान गायकीमुळेच यशवंत देव सुगम संगीताकडे वळले. आपल्या वडिलांकडून मिळालेला हा संगीताचा वारसा यशवंत देव यांनी समर्थपणे पुढे चालवला. आकाशवाणीवर सुगम संगीत विभागात, सतारवादक म्हणून त्यांची कारकीर्द सुरू झाली. आकाशवाणी केंद्रावर त्यांनी सुरू केलेला 'भावसरगम' हा कार्यक्रम खूपच गाजला. या कार्यक्रमातूनच गीतकार, गायक आणि संगीतकार अशी तिहेरी ओळख अवघ्या महाराष्ट्राला झाली. शब्दप्रधान गायकीचे उद्गाते अशी त्यांची ओळख अवघ्या महाराष्ट्राला झाली. आचार्य रजनीश यांच्या लेखनाचा त्यांनी केलेला अनुवाद देखील रसिकांना आवडला. 'अरे देवा तुझी मुले अशी का रे भांडतात', 'जीवनात ही घडी अशीच राहू दे', 'कोटी कोटी रूपे तुझी', 'तेच स्वप्न लोचनात' आणि 'स्वर आले दुरुनी' ही लिहिलेली काही गाणी आहेत. यापैकी मला आवडलेलं आणि रसिकांच्या हृदयात कायमचं कोरलं गेलेलं गीत म्हणजे 'स्वर आले दुरुनी' या गाण्याला अप्रतिम संगीत यशवंत देव यांनीच दिलं आहे. पण सुधीर फडके ऊर्फ बाबूजी यांनी हे गीत इतक्या उत्कटतेनं आणि आर्ततेनं गायलं आहे की त्यांचे स्वर थेट रसिकांच्या हृदयाला जाऊन भिडतात. या गीताचे बोल पुढीलप्रमाणे...

स्वर आले दुरुनी,<br>
जुळल्या सगळ्या त्या आठवणी

निर्जीव उसासे वाऱ्यांचे,<br>
आकाश फिकटल्या ताऱ्यांचे,<br>
कुजबुज ही नव्हती वेलींची,<br>
हितगुज ही नव्हते पर्णांचे,<br>
ऐशा थकलेल्या उद्यानी

विरहार्त मनाचे स्मित सरले,<br>
गालावर आसू ओघळले<br>
होता हृदयाची दो शकले,<br>
जखमेतून क्रंदन पाझरले<br>
घाली फुंकर हलकेच कुणी

पडसाद कसा आला न कळे,<br>
अवसेत कधी ना तम उजळे<br>
संजीवन मिळता आशेचे,<br>
निमिषात पुन्हा जग सावरले<br>
किमया असली का केली कुणी

♦

# पाश्चात्त्य संस्कृतीची दुसरी बाजू

• अक्षय मराठे (पृ १६), अंधेरी, मुंबई भ्रमणध्वनी : ९९६७५८६६५७

दहा-बारा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. कामानिमित्त अमेरिकेत असताना ह्यूस्टन शहरात वडिलांच्या एका मित्राकडे मी गेलो होतो. काका-काकू तीसेक वर्षांपासून अमेरिकेत असूनही अस्खलित मराठी बोलत होते. त्यांचा मुलगा संदीप हा कॉलेजमध्ये होता. तो मराठी संभाषणाला प्रतिसाद देत होता पण त्याचे बोलणे मात्र इंग्रजीत होते. काका म्हणाले, ''तो लहानपणी कविता, श्लोकही म्हणत असे परंतु पोषक वातावरण नसल्यामुळे मराठी बोलण्याची सवय राहिली नाही. तो भारतीय वंशाचा अमेरिकन तरुण होता.''

संदीपशी त्याचे कॉलेज, अभ्यास, शिक्षणाची पद्धत इत्यादी विषयांवर गप्पागोष्टी झाल्या. कॉलेजबरोबरच तो सरकारी ग्रंथालयात स्वेच्छेने काम करून थोडेफार पैसेही कमवत होता. दुसऱ्या दिवशी तो मला सहज म्हणाला, ''Dude, I am off to airport. Got to drop my friends, they are going to Vegas.'' ''That's great. You aren't going?'' - इति मी. त्यावर संदीप म्हणाला, ''They have saved well. I don't have that much savings!!.'' हे उत्तर मला अंतर्मुख करणारे होते. जेमतेम २० वर्षांचा तरुण, आईवडील सुखवस्तू, एका सहलीचा खर्च त्यांना सहज परवडणारा होता. तरीही त्यांच्याकडे पैसे मागायचा विचार ना त्याच्या मनात आला, ना आईवडिलांनी त्याला आपण होऊन पैसे देऊ केले. फक्त स्वतःची बचत नसल्यामुळे सहलीला न जाण्याचे सामंजस्य तो ह्या वयात दाखवत होता. एवढेच नव्हे तर आपण ह्या आनंदाला मुकत असतानाही मित्रमंडळींबद्दल हेवेदावे न ठेवता त्यांना तो विमानतळावर सोडायला जात होता.

मी काका-काकूंशी ह्या विषयावर कुतुहलाने बोललो. काकू म्हणाल्या, ''अगदी शाळेत असल्यापासून पालक मुलांना मर्यादित पैसे देतात व त्यांच्या आवडीच्या वस्तू घ्यायला सांगतात. त्यातून त्यांना पैशांचे महत्त्व समजते आणि ते स्वतंत्रपणे व्यवहार करायला शिकतात. कॉलेजमधील बहुतांश मुले एखादे काम करून अर्थार्जन करतात आणि स्वतःचे स्वातंत्र्य उपभोगतात. ही शिस्त आणि स्वातंत्र्य चांगले आहे रे पण एखादवेळेस म्हणूनच ही मुले जास्त practical होतात आणि नात्यांमध्ये त्यांची भावनिक गुंतवणूक नसते...'' हे बोलताबोलता काकू थबकल्या, त्यांच्या डोळ्यांत पाणी आले... पुढील बरेचसे न बोललेले शब्द मला समजले. एखाद्या चांगल्या गोष्टीच्याही दोन बाजू असतात हे सांगणारा तो प्रसंग होता.

......

अमेरिकेतील वास्तव्याच्या अखेरीस नेहमीप्रमाणे आम्ही घरातील वस्तू विकायला काढल्या. तेव्हाही एक प्रसंग मला सांस्कृतिक धक्का देऊन गेला. माझा मायक्रोवेव्ह ओव्हन घेण्यासाठी आमच्याच कार्यालयातील एडवर्ड नावाचा एक मोठा मॅनेजर मला भेटायला आला. मी थोड्याशा साशंक, थोड्याशा अपराधिक भावनेने त्याला ओव्हन दाखविला. एडवर्डला तो आवडला व तो खिशातून पैसे काढू लागला. त्याच्याकडून पैसे घेणे मला अयोग्य वाटत होते. मनातील घालमेल माझ्या चेहऱ्यावर उतरली. ती वाचून एडवर्ड स्पष्टपणे म्हणाला, ''Don't worry, it's common here'', असे म्हणून त्याने माझ्या हातात पैसे ठेवले. इतक्या मोठ्या व्यक्तीने second hand वस्तू का घ्यावी हा माझ्या मनातील प्रश्न मी त्याला बोलूनही दाखविला. तेव्हाचे त्याचे उत्तरही थक्क करणारे होते. ''माझा मुलगा आता कमवू लागला आहे व त्याच्या मैत्रिणीबरोबर स्वतंत्र आयुष्य चालू करत आहे. नंतर ते लग्नही करतील. त्यांचे भाड्याचे घर बसवण्यासाठी मदत म्हणून मी हा ओव्हन घेत आहे'' - इति एडवर्ड. पुन्हा माझ्या मनात अनेक विचार, अनेक प्रश्न...

माणूस कितीही मोठा असला तरी त्याचा मुलगा स्वतःचे आयुष्य शून्यातूनच चालू करतो व सर्व अडचणींचा सामना करत मार्गक्रमण करतो. त्यामुळे कौटुंबिक संपत्तीचा गर्व अथवा खानदानामुळे आपल्याला समाजात श्रेष्ठ स्थान आहे अशा पोकळ वल्गना करणे किंवा त्याबाबत प्रौढी मिरवणे हे पाश्चात्त्य संस्कृती शिकवतच नाही. उलट सर्वांनाच ह्या रगाड्यातून जायला लावून स्वावलंबी बनवते. पालकसुद्धा आपल्या मुलांना एका मर्यादेपुढे जसा आधार देत नाहीत तसेच वार्धक्यात ते आपल्या मुलांकडून फार अपेक्षाही ठेवत नाहीत. मुले आणि आई-वडील, आपल्याला हवी असणारी आणि दुसऱ्याला अपेक्षित असलेली personal space, आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना देतात. बहुतांश जण आपली कर्तव्ये पार पाडतातच पण आपल्या हक्कांच्या बाबतीत जागरूकच नाही तर आग्रही असतात. कदाचित त्यामुळेच तिकडचे तरुण भारतीय

संस्कृतीप्रमाणे सामाजिक बंधने अथवा लग्नसंस्थाही मानतातच असे नाही. सर्व प्रकारचे स्वातंत्र्य उपभोगतात. भारतीयांना थोडेसे न पटणारे असले तरी हे स्वातंत्र्य त्यांनी ''कमावलेले'' असते.

आपण किती सहजपणे पाश्चात्त्य संस्कृतीला स्वायत्त, स्वैराचारी म्हणून हिणवतो. भारतीय संस्कृतीचा अभिमान हवाच पण दुसरी संस्कृती जाणून न घेता त्यावर टीकाही नको.

अमेरिकेतील वास्तव्याने माझा कार्यालयीन कामाचा अनुभव वाढलाच परंतु त्या निमित्ताने अनेक प्रसंगांतून तिकडची संस्कृतीही समजून घेता आली. ही दोन छोटी संभाषणे त्यांच्या आणि आपल्या देशातील भिन्न विचारधारा दाखवून गेली. कुठलीही संस्कृती पूर्णपणे चांगली अथवा वाईट असे म्हणता येणार नाही. दोन्हींमधील चांगले ते उचलावे व न पटणारे सोडून द्यावे, हा विचार माझ्या मनात रुजला आणि माझे आयुष्य जास्त प्रगल्भ झाले.

♦

# आम्ही म्हातारे...

• श्री. मोरेश्वर ल. मराठे (पृ.४६८), सांगली भ्रमणध्वनी : ९४२२४२०६६९

**ख**रे पाहता वरील शीर्षक हेच मुळी चुकीचे. वय वाढले म्हणून 'ज्येष्ठ' हे विशेषण व 'ज्येष्ठ नागरिक' हेच विशेष विशेषण योग्य वाटते. होय की नाही माझ्या ज्येष्ठ मित्रांनो? बघा!



श्री. शुभदा साने यांनी 'विजयंत'च्या दिवाळी १९च्या अंकामध्ये ज्येष्ठांना आणखी विशेषणे जोडली आहेत. जशी... समृद्ध म्हातारपण, तरुण... स्वतंत्र... संसारी... अलिप्त... अबोल... स्वभावानुसार ही विशेषणे आहेत. तर त्यात मी आणखी भर घालतो जशी प्रवासी... आध्यात्मिक, रंगीला, स्वादिष्ट इ.इ. जो वयोवृद्ध आपल्याला परिस्थितीप्रमाणे आधुनिक उपकरणे, विचार, विचारसरणी, मुले-सुना यांच्याप्रमाणे स्वतःला बदलून घेतात ते खरे ज्येष्ठ नागरिक, बाकी सारे...

मी तर वाचले की एक ज्येष्ठ गृहस्थ मनात आले की, नेहमी तयार होऊन, स्वतःबरोबर छोटी बॅग, त्यात आधारकार्ड, एटीएम कार्ड, थोडी रक्कम, औषधे, स्वतःची माहिती घेऊन घरातून बाहेर पडतात. बस स्टॅण्डवर बसतात. समोर लागेल त्यामध्ये बसतात व प्रवास करतात, हवे त्या गावात उतरतात, भटकतात, खातात, पितात, वेळ पडली तर मुक्काम करतात. मुलाला फोन करून सांगतात. याला म्हणतात ज्येष्ठ नागरिकपण 'एन्जॉय' करणे, वेळ प्रसंगाचा आनंद घेणे. अर्थात हे सर्व मिळविण्यासाठी ज्येष्ठ हे निरोगी, हातपाय, कंबर, धड, मेंदू, बुद्धी उत्तम असणे आवश्यक आहे. परमेश्वराची कृपादृष्टी असणे महत्त्वाचे आहे. ज्यांना हे 'लेणं' मिळाले ते भाग्यवानच.

सर्वच ज्येष्ठांनी आपले उर्वरित आयुष्य सुखात, आनंदात व्यतीत करण्यासाठी आपल्या स्वभावात आमूलाग्र बदल केले पाहिजेत. जसे हट्ट, राग, लोभ, चिडचिडेपणा कमी केला पाहिजे. मुले, सुना, नातवंडे यांच्या प्रगतीत आपल्या विचारांचा अडथळा होता कामा नये. उलट आपल्या मित्रांना घरी बोलवा, चहा नाष्टा, कॅरम, गप्पा, पत्ते खेळा, टीव्ही बघा, सिनेमा बघा, सहली करा, बागेत जा, हलके व्यायाम करा जेणेकरून आपण आनंदी राहून व्यथा, विचार, दुखणी दूर ठेवा.

आजकाल कुटुंबे छोटी झाल्याने नवरा, बायको, नातवंडे त्यांच्या कामात व्यस्त असतात. वृद्धांकडे लक्ष देण्यास त्यांना वेळ नसतो. एकमेकांकडे जाणे-येणे बंद (कमी) झाल्याने, आपण कोणाकडे गेलो तर लावून घेत नाहीत. आपला कामामध्ये उपयोग नसतो. त्यामुळे निरुपयोगी व्यक्ती अशी भावना निर्माण होते. आर्थिक परिस्थितीमध्ये सुद्धा ज्येष्ठावर खूप मर्यादा येतात. तरी माझ्या ज्येष्ठ मित्रांनो, या सर्व नकारात्मक गोष्टींकडे दुर्लक्ष करा, योग्य तेवढेच बोला, मागितल्याशिवाय सल्ला देऊ नका, आपले ताट द्या पण पाट देऊ नका, संसारात लुडबूड करू नका, सोशीक व्हा, आनंदी राहा, देवधर्म, पूजाअर्चा, वाचन, मनन, चिंतन करा, व्यायाम, योग, प्राणायाम झेपेल, तेवढा करा.

एकच असे ठिकाण आहे की जिथे आपली हेटाळणी होणार नाही. कोणालाही त्रास होणार नाही. शांती-समाधान मिळेल. ते ठिकाण म्हणजे परमेश्वराचे चरण.

मीही ज्येष्ठच (पण म्हातारा नाही) असल्याने हा माझा सल्ला नाही तर मित्रत्वाचे विचारांची देवाणघेवाण आहे.

♦

# मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखा वर्धापन दिन व वार्षिक सर्वसाधारण सभा वृत्त

• श्री. विजय विष्णु मराठे, पुणे (कार्याध्यक्ष) भ्रमणध्वनी : ९४२३०११९४९

सर्व कपि गोत्री कुलबांधव आणि भगिनींना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

डिसेंबर २०२० मध्ये कार्यकारिणीची एक बैठक नेहमीप्रमाणे ऑनलाइन झाली. त्यात पुणे शाखा वर्धापनदिनाचा कार्यक्रम आणि संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा एकत्रित घेण्यासाठी पुणे शाखेच्या कार्यकारिणीला विचारणा केली गेली. त्यानुसार कार्यकारिणी मंडळाने होकार दिला.




सौ. निलांबरी ताईंच्या मार्गदर्शनाप्रमाणे पुणे कार्यकारिणीची बैठक झाली. त्यात संपूर्ण कार्यक्रमाची आखणी केली गेली. गेलं वर्षभर सर्व जण कोरोनामुळे आपसात भेटू शकत नव्हते. माफक उपस्थिती आवश्यक होती, त्यानुसार ६० कुलबांधव आणि भगिनी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पुणे शाखा वर्धापनदिनाचा कार्यक्रम साजरा करण्यासाठी दि.२६ जानेवारी २०२१ रोजी उपस्थित होते. प्रवेशद्वारावरील रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. सौ. मानसीची कन्या अवनीने रांगोळी काढली होती. आलेल्या प्रत्येकाला सॅनिटायझर वापरून तसेच टेंपरेचर तपासून नाव नोंदणी करून घेण्याची खबरदारी महिला मंडळ घेत होते.

सर्व उपस्थितांचे चहापान झाल्यावर १०.४५ ला सौ. मानसी मराठे गाडगीळ कार्यवाह पुणे शाखा, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून पुणे शाखा वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाची सूत्रे सौरभ याला सोपवली. दीपप्रज्वलन माननीय विश्वस्त श्री. मोहन राव (बडोदा), कार्याध्यक्ष विजय, पुणे शाखा कार्याध्यक्षा सौ. अंजली विजय, तसेच श्री. अरुण राव, सौ. निलांबरी यांचे हस्ते करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

नव युवकांना संधी म्हणून सौरभ (सूत्रसंचालक) यांनी श्लोक पठण केले. सुप्रसिद्ध संवादिनी वादक श्री. प्रमोद मराठे, संचालक गांधर्व महाविद्यालय यांनी त्यांचे वडिलांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून आपल्या कुलाकरता काही कार्य करायची इच्छा प्रकट केली. याबाबत सविस्तर माहिती दिली गेली.

पुणे शाखा कार्याध्यक्षा सौ. अंजली विजय यांनी आपलं मनोगत व्यक्त केले. नवीन कार्यकारिणीची ओळख करून दिली.

तरुण नवोदित कलाकारांना प्रोत्साहन म्हणून शिरूर येथील आपले कुलबांधव श्री. गणेश मराठे यांनी सुश्राव्य भावगीत सादरीकरण केलं. त्यांना सर्वश्री श्री. शिरीष जोशी (निवृत्त जनता सहकारी बँक अधिकारी आणि सवाई गंधर्व महोत्सवात गेली ४० वर्षे स्वयंसेवकाचे काम करत आहेत.) यांनी तबल्याची उत्तम साथ दिली. श्री. माधव पावगी (जिल्हा परिषद येथून सेवानिवृत्त, स्वतः गीतरामायण गाऊन सादर करतात, अनेकांना संवादिनी वादनाने उत्तम साथ करतात) यांनी संवादिनीची साथ करत काही भावगीते सादर केली. सर्व कुलबांधव गणेश मराठे यांच्या भावगीत कार्यक्रमात रमून गेले होते. गणेश यांना संस्थेचे विश्वस्त श्री. मोहन राव यांनी श्रीफळ देऊन सन्मान केला, तसेच शिरीष जोशी यांना संस्थेचे कार्यवाह हेमंत यांनी श्रीफळ देऊन सन्मान केला आणि संस्थेचे कोषाध्यक्ष अनंत राव यांनी माधव पावगी यांना श्रीफळ देऊन सन्मान केला.

नंतर 'मराठे प्रतिष्ठान'ची वार्षिक सर्वसाधारण सभा चालू झाली. सभेची सूत्रं कार्यवाह हेमंत यांना सोपवली गेली. व्यासपीठावर विश्वस्त मोहन राव, कार्याध्यक्ष विजय, कोषाध्यक्ष अनंत राव, कार्यवाह हेमंत स्थानापन्न होते.

हेमंत यांनी मागील वर्षीचा अहवाल सादर केला. काही ठराव मंजूर केल्यानंतर कार्याध्यक्षांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेची आर्थिक वृद्धी होण्यास सभासदांनी हातभार लावला तर चांगलेच होईल. तसेच जे सभासद नाहीत त्यांनी लवकरात लवकर सभासदत्व स्वीकारून आपल्या संस्थेला यथायोग्य आर्थिक सहाय्य केले तर बरे होईल, असे सांगितले.

२६ जानेवारीचे औचित्य साधून सामूहिक 'वंदे मातरम'नंतर कार्यक्रमाची सांगता झाली. नंतर सुग्रास भोजनाचा आस्वाद घेत कुलबांधवांच्या आपसात गप्पा रंगल्या होत्या.

कार्यक्रमाचे औचित्य साधून श्री. नागेशराव (वकील) यांनी प्रतिष्ठानला रु. ५०००/- ची देणगी दिली. त्यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन. सौरभ यांनी आभार प्रदर्शन केले तसेच कार्यक्रमाला 'इंदिरा मोरेश्वर सभागृहा'चे व्यवस्थापक मराठे गोखले केटरिंग, गुरूकृपा स्पीकर सिस्टीम यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले.

♦

# भीती, फोबिया आणि हतबलता

कोरोना आता वर्षाचा झाला
मागच्या वर्षी जन्माला आला
बाळसे आता धरू लागला
पाळण्यातले पाय पसरू लागला

टाळ्या, घंटानाद करून पाहिला
तो मात्र मुळीच नाही घाबरला
सणवार वर्षभर गुंडाळून ठेवले
गोडधोड सारे बेचव लागले

पाडव्याला गुढी गुमान उभारली
बिचारी मान पाडुन उभी राहिली
दसरा दिवाळी साधीसुधी केली
शकुनाची पणती तेवढी तेवत ठेवली

जुळलेली लग्ने लांबत राहिली
ना बाराती, ना बँन्डबाजा
सोशल डिस्टन्सिंग पाळत
घरातच उरकून घेतली

खर्च आणि बाजार मात्र
कोरोनाला न जुमानता
वरवर सारखे चढतच गेले
मध्यमवर्गीयांचे कंबरडे मोडले

घरात कोंडले गेलेले लोकही
कावले, सोशल डिस्टन्सिंगचे
हसे झाले, रंगीबेरंगी मास्कची
फॅशन आउटडेटेड झाली

सुईच्या भीतीला कोरोना घाबरेना
लसीकरण मुळीच फळेना
राजकारण मात्र फळफळले
लसीलाही पक्षाचे लेबल लावले

दारूपासुन मंदिरापर्यंत
शाळे पासुन कॉलेज पर्यंत
उघड झापे साठी आंदोलन केले
कधीतरी काहीतरी उघडले

साऱ्याच्या खेळखंडोबात
सर्वांचेच चांगभले झाले
ज्ञान, भक्ती, मुक्ती मात्र
कायमच लॉकडाउन राहिले.

दिवसामागुन दिवस कसे
भुर्रकन उडाले, वर्षतर सरले
स्थितप्रज्ञासारखे आयुष्य
निर्गुण निराकार झाले

**– संजय उवाचं**




**दि. २१ फेब्रुवारी २०२१ रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह ठाणे येथे 'नारी तु नारायणी' या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रातील विशेष कार्य करणाऱ्या महिलांना सन्मानित करण्यात आले. त्यावेळी आपली कुलभगिनी संध्या खांबेटे यांना संगीत क्षेत्रातील विशेष कार्यासाठी मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. मराठे परिवार आनंद व्यक्त करत आहे. खूप खूप अभिनंदन.**

## सहवेदना



**घाटकोपर पूर्व येथील श्रीमती रोहिणी गजानन मराठे यांचे दिनांक १३ डिसेंबर २०२० रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो. 'मराठे प्रतिष्ठान'तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!**

# यशस्वी उद्योजक होण्यासाठीच्या दहा आवश्यक गोष्टी

• डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९) भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

नमस्कार मित्रांनो! तरुण पिढीतील बरेच मराठी युवक - युवती यशस्वी उद्योजक बनताना पाहून खूप छान वाटतं. बऱ्याच शहरांमध्ये मराठी उद्योजकांच्या संघटना खूप सक्रिय आहेत नि 'महाराष्ट्रीय उद्योजकता' वाढविण्यासाठी भरपूर व कल्पक प्रयत्न करताहेत. मारवाडी, गुजराती व सिंधी अशा पारंपरिक उद्योजकीय समाजांमध्ये उद्योगाचं बाळकडू लहानपणीच मिळतं. भोवतालचं वातावरणही उद्योजकीय असल्यामुळे 'नैसर्गिक उद्योजकता' ही आपसूकच बहरते. मराठी समाजामध्ये मात्र थोडे नेटके प्रयत्न उद्योजकता - उभारणीसाठी करावे लागतात. अगदीच अलीकडच्या मराठी युवकांमध्ये 'यशस्वी उद्योजक' बनण्याची ऊर्मी वेगाने वाढते आहे. या युवकांसाठी इथे अगदी संक्षिप्तपणे यशस्वी उद्योजक होण्यासाठीच्या दहा महत्त्वाच्या गोष्टी मांडत आहे. (युवकांनी 'यशस्वी उद्योगाचे ३६ मंत्र' हे मॅजेस्टिक प्रकाशनने प्रकाशित केलेले माझे छोटे पुस्तक जमल्यास जरूर वाचावे.)

उद्योजक बनू इच्छिणाऱ्या प्रत्येकाने पहिली गोष्ट करावी - स्वतःतील असलेले वा आत्मसात करण्याजोगे सहा महत्त्वाचे गुण तपासावेत. संपत्ती निर्माण करण्याची लालसा, स्वभावातील लवचीकता (विशेषतः संयम आणि संभाषणातील नम्रता), नेटवर्क उभे करण्याचे कौशल्य व त्यासाठी भरपूर प्रवास करण्याची तयारी, वेगाने निर्णय घेण्याची व काम करण्याची तयारी, धोका पत्करण्याची तयारी, चातुर्य आणि कल्पनाक्षमता. हे गुण किमान ५० टक्के तरी असावेत. या नंतरची दुसरी तयारी म्हणजे विविध पर्यायी उद्योगांचा अभ्यास. सहा महिने (नोकरी करणाऱ्यांनी वेळात वेळ काढून) हा अभ्यास केल्याने उद्योग - निवडीचा निर्णय सोपा होतो. तिसऱ्या टप्प्यावर स्वतः निवडलेला उद्योग करणाऱ्या एखाद्या चांगल्या कंपनीत दोन वर्षे नोकरी करावी. ''लर्निंग आणि अर्निंग'' अशा दोन्ही गोष्टी यातून साध्य होतात. या नोकरीमुळे निवडलेल्या उद्योगातील खाचखळगे धोका न पत्करता अभ्यासता येतात.

उद्योजक बनण्याच्या वाटचालीत चौथा टप्पा हा अत्यंत महत्त्वाचा. या टप्प्यावर पाच गोष्टी ठरवाव्या लागतील - विशिष्ट प्रॉडक्ट, भांडवलाची तरतूद, उद्योगाची टीम, बाजाराची निवड आणि उद्योग करण्याची पद्धत (बिझनेस मॉडेल). या पाचही गोष्टीत तुमची 'टीम' सर्वात महत्त्वाची. कोणत्याही उद्योगाचं अर्धं यश हे टीमच्या ताकदीवर बेतलेलं असतं. वाटचालीच्या पाचव्या टप्प्यावर होऊ घातलेल्या उद्योजकाने स्वतःची उद्योजकीय क्षमता सुधारण्यासाठी चार छोटे कोर्सेस करावेत. यातून चार उद्योजकीय क्षमता सुधाराव्यात - उद्योगाचं तांत्रिक ज्ञान, व्यूहात्मक विचार करण्याची क्षमता, वित्तीय विश्लेषणाचं व नियंत्रणाचं कौशल्य आणि उद्योजकीय मानसिकता. सहावी गोष्ट ही चार वर्षांच्या आर्थिक तरतुदीची. कोणत्याही उद्योजकासाठी पहिली चार वर्षे ही खडतरच असतात. या चार वर्षांच्या कौटुंबिक खर्चासाठी किमान तजवीज केलेली बरी. उद्योगाच्या जडणघडणीत कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटू नये. ही चार वर्षांची तजवीज आधीच्या पगारातून करण्यात यावी.

सातवी अत्यंत महत्त्वाची बाब ही आपला ''जीवनसाथी'' निवडण्याची. साधारणपणे २३व्या वर्षी तुम्ही नोकरीला लागला असाल तर २८ ते ३० या वयात उद्योगात तुम्ही शिरकाव करायला हवा. यासाठी तुम्हाला भक्कम साथ ही हवीच. तुमचा जोडीदार नोकरी करीत असेल तर एका पगाराचा मोठा आधार सुरुवातीच्या उद्योजकीय वाटचालीत होतो. उद्योग मार्गी लागल्यावर तुमचा जोडीदारही उद्योगात सामील होऊ शकतो. यास्तव उत्तम जोडीदार निवडणे व योग्य वेळी विवाह करणे हे आवश्यक ठरते. किंबहुना हा एकूणच व्यूहात्मक वाटचालीचा मोठा हिस्सा मानायला हवा. तुमचे आणि तुमच्या जोडीदाराचे उद्योजकीय कौशल्य हे परस्परपूरक असायला हवे. उदाहरणार्थ, तंत्रज्ञान व वित्तीय कौशल्य अथवा उत्पादन व विक्री कौशल्य इ. वेळेवर विवाह झाल्यास तुमच्या दूरगामी अशा वृद्धत्वाचे व उद्योजकीय वारसा (आवश्यकतेनुसार) घडविण्याचे नियोजनही सोपे होते. अन्य शब्दांत, ''बिझनेस गव्हर्नन्स'' आणि ''फॅमिली गव्हर्नन्स'' या दोन्ही बाबींमध्ये संतुलन साधायला हवे.

आठवी गोष्ट ही उद्योजकीय वाटचालीचे सुरुवातीचे तीन महत्त्वाचे टप्पे ठरविण्याची. यात पहिला टप्पा हा ''टेक ऑफ'' करण्याचा. वैमानिक हा विमानाला वर उचलताना वेग, दिशा व वजनातील संतुलनाची खूप काळजी घेतो. तद्वतच उत्पादन

करण्यापूर्वी फक्त खरेदी – विक्रीचा उद्योग केल्यास बरेच बारकावे कळतात व धोक्यांची जाणीव होते. दुसरा टप्पा हा कन्सॉलिडेशन करण्याचा म्हणजे उद्योगाची मांड बसविण्याचा. वैमानिकही विमानाला विशिष्ट उंचीवर नेल्यानंतर वेग व दिशा पक्की करतो. तिसऱ्या टप्प्यात वेग वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी आपल्या उद्योजकीय साखळीत नव्या मदतनिसांची भर घातली पाहिजे. प्रत्येक गोष्ट स्वतःच करण्याची गरज नसते. हा, अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आपल्या नियंत्रणात असल्या पाहिजेत. या संपूर्ण वाटचालीत खर्चाकडे बारकाईने लक्ष ठेवायला हवे. सुरुवातीलाच मोठी कर्जे घेऊ नयेत. स्वतःचा पगार कमी घेत व नफ्याची पुनर्गुंतवणूक करीत उद्योगाचा वित्तीय पाया मजबूत करायला हवा.

साधारणपणे वयाच्या ४५ वर्षांपर्यंत फक्त आणि फक्त उद्योगाकडेच लक्ष द्यावे. सामाजिक – राजकीय मानसन्मान आणि मंचांपासून दूर रहावे. सामाजिक व राजकीय संबंधांचा उद्योगासाठी वापर करावा पण या संबंधांमध्ये भावनिकदृष्ट्या अडकू नये. ही नववी बाब खूप महत्त्वाची. थोडं उद्योजकीय यश मिळालं की स्तुतिपाठक अवतीभोवती गोळा होतात. ब्रँडिंगसाठी चार आवश्यक गोष्टी कराव्यात पण स्तुतिपाठकांच्या आहारी जाऊ नये. दहावी नि अंतिम महत्त्वाची गोष्ट ही उद्योगात अयशस्वी झाल्यास भावना टाळून त्यातून नीटपणे बाहेर पडण्याची. पुन्हा नोकरी करावी लागल्यास संकोच न करता ती करावी. एक पॉज घेऊन प्रामाणिक इच्छा व लढण्याची तयारी असल्यास नव्या उद्योजकीय वाटचालीची तयारी कुटुंबीयांच्या संमतीने व आधाराने जरूर करावी. आधीच्या उद्योगाचं दिवाळं वाजलं तरी लाज बाळगू नये वा घाबरू नये. या अपयशातून गंभीर व उपयोगी धडे मात्र जरूर घ्यावेत. उद्योजकीय यशापयशाला पचविण्याची मानसिक तयारी ही सुरुवातीपासूनच ठेवायला हवी. नोकरीतलं आश्वासक जगणं (जे हल्ली फारसं आश्वासक राहिलेलं नाही!) हे उद्योजकतेत नसतं, हे वास्तव प्रत्येकाने स्वीकारायला हवं. अर्थात ''Risk carries Return'' या उक्तीनुसार यशस्वी उद्योगातला नफा हा पगारापेक्षा कितीतरी मोठा असतो. महत्त्वाची बाब म्हणजे तुम्ही तुमचे सारे कष्ट स्वतःच्या उद्योगासाठी लावत असता आणि तुम्हीच तुमचे ''बॉस''ही असता! ♦

---

# वास्तवदर्शी लेखन

'छपाई ते लेखणी' हा यशवंत मराठे यांच्या लेखांचा संग्रह. लेखकाचा वडिलोपार्जित व्यवसाय मुद्रणयंत्रे उत्पादनाचा. पुढे त्यांनी सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून **'नीरजा'** ही संस्था सुरू केली. ही संस्था सार्वजनिक जलपुनर्भरणाचे काम करते. हा व्याप सांभाळत असताना लेखकाने आपला हातही लिहीता ठेवला. साधी-सरळ लेखनशैली हे त्यांचे वैशिष्ट्य. त्यांच्या लेखनातील सच्चेपणा, लीनता विशेष भावते. त्यांच्या लेखनाची सुरुवात होते त्यांचे आजोबा स्व. आप्पासाहेब अर्थात सखाराम मराठे यांच्यावरील लेखनाने. यात आजोबांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणांची उत्तम मांडणी ते करतात. त्यांचा व्यावसायिक आवाका आणि धमक, कराचीतील त्यांचे वास्तव्य व समस्या आणि त्यानंतर कराचीतील मालमत्ता विकून (अर्थात तोट्याचाच सौदा!) गाठलेली मुंबई आणि मुद्रण व्यवसायात रोवलेले पाय आणि पुढे वाढवलेला पसारा-जो आजही 'मराठे उद्योग समूह' म्हणून सर्वश्रुत आहे... हे वाचून त्यांच्या आजोबांची धडाडी जाणवते, 'आनंदी जीवनाचा पाया', 'आयुष्याचे ध्येय' या लेखांमध्ये आनंदी जीवन जगण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याचे विवेचन त्यांनी केले आहे. या चिंतनातून लेखकाच्या मनाचा सच्चेपणा, समाधानी वृत्ती प्रकर्षाने जाणवते. आयुष्याचे ध्येय निश्चित करताना आध्यात्मिक पातळीवर चर्चा रंगते. हाच धागा पुढे 'ओशो-एक त्सुनामी' या लेखात विस्तारला आहे. अध्यात्माच्या दुनियेतून पुढे फुलांच्या सुगंधी जगामध्ये लेखक वाचकाला घेऊन जातात. हे लिहिताना संगीत, सूर, सुगंध ते नीलकमल, आंब्याचा मोहोर, शेण, मूत्र, कच्च्या दुधाचा वास अशी चर्चा रंगत जाते. 'गावगाड्याची कहाणी'मध्ये गावचा विचार करताना गावाचे नाव, रचना, गावचा कारभार, तेथील फिरस्ते अशा अनेक अंगांचा विचार लेखक करतात. 'गिरणगाव' या लेखात गिरण्यांचा इतिहास, गिरण्यांचा उदयास्त, गिरणी संपाचा ऊहापोह लेखात केला आहे. पुस्तकात विशेष उल्लेखनीय आहेत ती व्यक्तिचित्रे. लता मंगेशकर, वडील सुरेश मराठे, जोशीकाका, डॉ. दीपक यादव, भालचंद्र जोशी यांची व्यक्तिचित्रे उत्तमरीत्या उतरली आहेत. इतिहास, संस्कृती, चालू घडामोडी, अध्यात्म, तत्त्वज्ञान, ज्योतिष अशा अनेक विषयांवरचे लेखन लेखकाची बहुश्रुतता अधोरेखित करते.




'छपाई ते लेखणी' – यशवंत मराठे,
ग्रंथाली प्रकाशन
पृष्ठे १८३, मूल्य २०० रुपये

# माझी फॉरेनची मुशाफिरी

• श्री. उल्हास मराठे (पृ. ६०१), सुरेंद्रनगर, गुजरात भ्रमणध्वनी : ९८२५२२३७३८

**स**न १९७१ ते १९८१ एन.आर.बी.मध्ये काम केल्यानंतर मला परत पॅरिस ट्रिपची ऑफर आली होती. पण परत ५ वर्षे बॉड घ्यायची माझी तयारी नव्हती. आतापर्यंत मी इंजिनीयरिंग मशिनवर मार्किंग पंच आणि बिस्कीट डाईज बनविण्याचे काम नितीनच्या मदतीने सुरू केले होते व रवीच्या मदतीने डिझाइन ड्रॉइंगचे काम सुरू केले होते. माझ्या पगाराएवढे पैसे मी आरामात शनिवार-रविवारच्या कामात कमावू शकत होतो. म्हणून मी १९८१च्या मार्चमध्येच एन.आर.बी.चा राजीनामा दिला व पूर्ण वेळ उद्योग चालू केला. मला जयंत पंडितच्या कंपनीचे ड्रॉइंगचे काम व एन.आर.बी., ब्रिटानिया, शालिमारची इंजिनीयरिंगची कामे मिळू लागली. टेक्सस्पिन व मे. के.सी.आय. अजून ओ. ई. सप्लाय करत नव्हते. टेल्कोला दिलेली केजेस् दोन वेळा रिजेक्ट झाली होती म्हणून श्री. जॉनने मला २ दिवसांसाठी सुरेंद्रनगरला येण्याची विनंती केली. मी माझ्या कामात पूर्ण बिझी असल्याने थोड्या नाराजीनेच सुरेंद्रनगरला गेलो. त्यांचा प्रॉब्लेम मी सोडवल्याने त्यांचा टेल्कोतील सप्लाय चालू झाला व ह्या ग्रुपशी माझे कायमचे नाते जोडले गेले. थोड्याच दिवसात मी महिन्यातून ३-४ वेळा राणपूर व सुरेंद्रनगरला जाऊ लागलो. दिलीप भाईंची धडाडी व फॅक्टरीच्या लोकांची कामाची व नवं आत्मसात करायची शक्ती यामुळे हा ग्रुप टेल्को, एल.एम. डब्लू. वगैरे कंपनीसाठी ॲप्रुव्हड झाला व माझे येणे-जाणे वाढू लागले.

त्याच दरम्यान भूपतभाईंची एखादी परदेशी टूर करण्याची फार इच्छा होती. त्यांनी मला दिलीप भाईंशी बोलायला सांगितले. त्यांच्या एका राणपूरच्या ट्रिपमध्ये मी विषय काढला व दिलीप भाईंनी लगेच परवानगी दिली. ठाण्याला आल्यावर श्री. डी.एम.शहा, मे. क्रिसेंट स्प्रिंगशी बोललो व त्यांनी पण सोबत येण्याची इच्छा दाखविली. Orbit Tour Mumbai, Frank Furt – Rome Mumbai होती. त्यामध्ये Hanoverच्या प्रदर्शनाला व नंतर बोगोसेसीयाला मी व भूपत भाईंनी जायचे नक्की केले. भूपत व डी.एम. शहा पहिल्यांदाच येत असल्याने त्यांना रोज शंका येत होत्या. शेवटी आम्ही दोघेही ऑरबिट सोबत फ्रँकफर्टला सकाळी पोहचलो. एअरपोर्टवरच त्यांची बस आली होती. सुमारे ३५० कि.मी.चे अंतर होते. आम्हाला वाटले आता कमीतकमी ८ तास तरी लागतील. रस्ते अप्रतिम सुंदर व शिस्तबद्ध ट्रॅफिकमुळे बस १२०च्या स्पीडने जात होती. जातानाच ट्रिपची संपूर्ण माहिती त्या लोकांनी दिली. आमच्या तिघांची एक कुटुंबात एका खोलीत रहाण्याची सोय केली होती. ही सोय एक्झिबिशनच्या लोकांनीच अतिशय स्वस्त दरात केली होती. जेवण खाणं टूरवालेच करत होते. हवामान चांगले असल्यामुळे फिरायला फारसा त्रास नव्हता. घरापासून एक्झिबिशन ग्राउंडवर जायला ट्रेनची सोय होती. एक्झिबिशनच्या एंट्री पासवाल्यांना ट्रेन टूर मोफत होती. एक्झिबिशन ग्राउंड हे गाडीचे शेवटचे स्टेशन होते व आमचे घर एका स्मशानाच्या शेजारी होते. स्मशान आपल्या एखाद्या बागेपेक्षा १० पट चांगले व सुशोभित होते. श्री. डी.एम. शहा यांनी त्यांच्याबरोबर काही डॉलर आणले होते. ते देऊन मार्क घेण्यासाठी आम्ही एका बँकेत गेलो. नेहमी २ मिनिटांत काम होत असे पण १० मिनिटे झाली तरी कोणीच काऊंटरवर आले नाही आणि थोड्याच वेळात २ सहा फुटी पोलीस आले व विचारू लागले, ''त्या नोटा कोणाच्या आहेत, कुठून घेतल्या? आणखीन किती आहेत?'' तरी आम्हाला समजेना. त्यांना इंग्लिश येत नव्हते पण तोडक्या मोडक्या इंग्लिश - जर्मनीमध्ये मला मथितार्थ समजला. त्यातील एक नोट खोटी होती. त्यांना काही प्रोसिजर समजत नव्हती. नॉर्मल प्रोसिजरप्रमाणे अशा माणसाला बेड्या घालून पोलीस ठाण्यावर नेतात व कोर्टात उभे करतात. पोलीस स्टेशनवर आम्हा तिघांची वरात निघाली. पोलीस स्टेशन जवळच होते. पोलीस स्टेशनवर पण कोणालाही इंग्लिश समजत नव्हते. शेवटी त्यांनी सरकारी वकील व एक दुभाषा बोलावला. तेव्हा उलगडा झाली की ते ही नोट खोटी असल्याचे म्हणत होते. त्यांच्या म्हणण्याला संपूर्ण दुजोरा दिला. आम्हाला ती नोट नकोच पण आमच्या तिघांकडे असलेल्या सर्व नोटा त्यांच्यापुढे ठेवल्या व चेक करून घेतल्या. बाकी सर्व ठीक होत्या त्यामुळे असे तीन-चार तासांचे नाटक होऊन आमची सुटका झाली. तिघेही एका दडपणाखाली होतो. कोणीच कोणाशी बोलत नव्हतो. परत पोलीस पकडतील का अशी खोटी भीती वाटत होती. तेव्हा तिघांनीही शपथ घेतली की काही झाले तरी बाहेरून करन्सी घ्यायची नाही किंवा कोणी दिलीच तरी करन्सी चेंज काऊंटरवर

तपासून घ्यायची.

एक्झिबिशन खूपच मोठे होते. १३ मोठे हॉल भरून स्टॉल्स होते. इंजिनीयरिंगमध्ये सर्व गोष्टी दुनियाभरहून लोकं घेऊन येतात. रोज फिरून फिरून पायाचे तुकडे पडत होते व रात्री केव्हा झोप लागे समजत नव्हते. ४ दिवस एक्झिबिशननंतर श्री. शहा, व्हाया रोम परत गेला व मी व भुपतभाई ट्रेन पकडून आम्ही Borgaseciyaला जाणार होतो. एअरपोर्टवरून आम्ही ट्रॉलीवर सामान टाकून बाहेर आलो. सामान उतरवले आणि उतार असल्याने ट्रॉली जाऊन एका टॅक्सीला टेकली. टॅक्सीवाला भांडत आला, ''माझ्या टॅक्सीवर डेंट पडला. मला ५००० लिरा खर्च रिपेरिंगसाठी द्या.'' हो नाही करताना त्याला आम्ही २००० लिरांना पटवला. इटालियन फारच खतरनाक, त्यांच्याशी सांभाळून रहावे लागते. बऱ्याचवेळा एअरपोर्टवर लोकांचे पाकिट, पासपोर्ट चोरीस जातात. आमच्यापैकी एकाला तर दोन मुलींनी चांगलेच गंडवले. दोघी आल्या व त्याच्याशी काहीतरी बोलण्याचा प्रयत्न केला व सरळ त्याच्या कोटात हात घालून त्यांचे पाकिट, पाऊच काढून घेतले व त्यांच्यातल्याच एकाकडे पासऑन केले. आमच्यातल्या माणसांनी आरडाओरडा केला व त्या मुलीचा हात पकडून धरला. पोलीस आले व त्या मुलीनी उलटा कांगावा केली की ह्यांनी माझा हात पकडला व हात सोडवून पळून गेल्या. त्यामुळे एअरपोर्ट, रेल्वेस्टेशन वगैरे ठिकाणी खूपच सावध रहावे लागते. इंडियन लोकांना हेरून त्यांच्या मागे लागतात. पुढे ते लोक वापरणाऱ्या बऱ्याच ट्रिक्सची माहिती येईल.

आम्ही संध्याकाळी ४ वाजता बोरगोसेसीयाला जाण्यासाठी मिलानोची गाडी पकडली. तो सुट्टीचा पहिला दिवस होता त्यामुळे प्रचंड गर्दी होती. आम्ही जेमतेम उभे राहून आलो. मिलानोला प्रोसिनोचा ड्रायव्हर आला होता. उंचापुरा ६८ वर्षांचा म्हातारा पण ट्रॉली न शोधता आमच्या बॅगा दोन हातांत दोन उचलून चालायला लागला. सुमारे २ तासांच्या प्रवासानी आम्ही बोरगोसेसीयला पोचलो. त्यांच्या फॅक्टरीच्या समोरच गार्डन हॉटेलमध्ये आमची उतरायची सोय होती. सकाळी कार्लो प्रोसिनो घ्यायला आले. त्यांना आम्ही दोन वर्षांपूर्वीच इंडियात भेटलो होतो. अत्यंत गमत्या पण तितकाच नॉलेजेबल माणूस. आपल्यापेक्षा जास्त इंडिया, पाकिस्तान, गांधीजींचा अभ्यास केलेला आहे. त्यांनी सर्व फॅक्टरी दाखविली. घरी जेवायला घेऊन गेले. जेवण झाल्यानंतर त्यांच्या बायकोने मला व भूपतला आमच्या बायकांसाठी घड्याळे घेऊन दिली. त्याचा मुलगा त्रोलो अजून शाळेत शिकत होता. तो शिकायला मिलानोला जात असे. आम्ही त्याच्या बरोबरच मिलानोला गेलो व मिलानोवरूनच इंडियासाठी विमान पकडले. अशी आयुष्यातील २ री परदेशवारी संपन्न झाली.

भूपत आणि डी.एम. शहा यांच्यासह मी हॅनोवर येथील एका स्टॉलवर असताना आम्ही एक Auto Adjustable Spanner पाहिला त्याची १२५ जर्मन मार्क ही किंमत तशी जास्तच होती पण तरी आम्ही तो खरेदी केला. परत आल्यावर बऱ्याच जणांशी चर्चा केली व विचार केला की कोणी तयार झाले तर त्याचा फायदा होईल. घेतलेला स्पॅनर संपूर्ण मशिनिंग केलेला होता. त्यामुळे त्याची किंमत खूपच जास्त होती व प्रॉडक्शनपण निघत नव्हते. तेव्हा मी ह्या गोष्टीची चर्चा श्री. चंद्रकांत सोलंकी, (सोलसन्सचे) ह्यांच्याशी केली. त्यांना ती कल्पना खूपच आवडली. त्यांच्या लेथ चकच्या संदर्भात मी त्यांना मदत करत होतोच. तेही नवीन प्रॉडक्टच्या शोधात होते. मग स्पॅनरची मेन बॉडी, इन्व्हेस्टमेंट कास्टिंग व हँडल दोन लेअरमध्ये पंचिंग करून बऱ्याच कष्टाने नवीन स्पॅनर तयार झाला. त्याला पॉप स्पॅनर असे नाव देण्यात आले. त्याचबरोबर एक न्यूमॅटिक फिडर पण आणला होता. तो पुढे ठाण्यातच जयंत गोखले यांना डेव्हलपमेंटसाठी दिला. त्यांनी तो पुढे खूप चांगला डेव्हलप केला.

आता स्पॅनरच्या मॅन्युफॅक्चरिंगवर सोलसन्सचा चांगलाच जम बसला होता. त्यांनी तो कलोनच्या प्रदर्शनात जर्मनीला ठेवायचा नक्की केला. ओरिजिनलपेक्षा खूप चांगल्या सुधारणा केल्या होत्या. सुलभ होण्यासाठी स्प्रिंग टाकली होती. डेमोसाठी सुरेख युनिट केले होते. सी.व्ही.सोलंकी यांनी मला येण्याची गळ घातली. त्यांची ही पहिलीच परदेशवारी होती. नेहमीप्रमाणे सामान व वजन याचा मेळ बसेना. आमची फ्लाइट दिल्लीवरून होती. आम्ही सकाळच्या विमानाने दिल्लीला गेलो. सामान परत बसवण्याचा प्रयत्न केला. एक बॅग कमी केली. एका बॅगेत दोघांचे सर्व कपडे व दुसऱ्यात कंपनीचे सर्व सामान, प्रिंटेड मटेरियल इ.इ. रात्री एअरपोर्टवर दुसरेच नाटक झाले. तिथे गेल्यावर समजले आमची तिकिटे वेटिंग लिस्टवर आहेत. अगदी शेवटच्या क्षणाला त्यांनी एकाला घेऊन जाण्याची तयारी दाखवली. आता कोणी जायचे व कोणती बॅग न्यायची. विचाराला फार वेळ नव्हता. शेवटी सी.व्ही. सोलंकी आणि कंपनीच्या सामानाची बॅग घेऊन जायचे असे ठरले. आता प्रदर्शनाला दोन दिवस बाकी होते. मी मागाहून यायचे ठरले. सी.व्ही. आत गेला तरी मी एअरलाइनच्या काऊंटरला उभा राहिलो व माझे रडगाणे चालू ठेवले, मला उद्याच्या किंवा

युरोपमधील कोणत्यातरी कंट्रीत जाणारी फ्लाइट द्याच. विमान सुटायला १० मिनिटे असताना माझे नाव पुकारले गेले व धावत पळत माझी बॅग चेक इन केली व मी विमानात बिझिनेस क्लासमध्ये बसवलो गेलो. विमान नॉर्मल मोडमध्ये आल्यावर पाहिले तर सी.व्ही. सोळंखी खाली कुठेच दिसेना. शेवटी मी कू मेंबरला विचारले तेव्हा त्यांनी तो पहिल्या मजल्यावर आहे म्हणून सांगितले. मला पाहून सी. व्ही. उडालाच. त्याला मी येईन अशी अपेक्षाच नव्हती. मग मी सर्व स्टोरी सांगितली व त्याला हायसे वाटले. सकाळी ॲमस्टरडॅमला उतरून फ्रँकफर्टचे विमान पकडले. इमिग्रेशन झाल्यावर बॅगेंची वाट पहात थांबलो. मी चेक इन केलेली बॅग आली पण दुसरी येईना. सर्व बॅगा संपल्यावर पण आमची बॅग आली नाही. शेवटी कंम्प्लेंट केली व त्यांनी पुढील ॲमस्टरडॅम - फ्रँकफर्टची वाट पहायला सांगितली. दोन तास वाट पाहून त्यात पण नाही असे पाहून तक्रार नोंदवून आम्ही गाडीने कलोनला गेलो. तिथे दोन दिवसांसाठी रेल्वे स्टेशनवरील Ibis वरच बुकिंग होते. लकीली माझी आंतर्वस्त्र व पायजमा मी माझ्या हँडबॅगमध्येच ठेवला होता. परंतु सकाळी उठल्यापासून सर्वच गोष्टीत अडू लागले. एअरलाइननी १२० अधिक १२० असे २४० फ्रँक दिले व आमची बोळवण केली. सकाळी प्रथम दुकाने उघडण्याची वाट पहात होतो. मग दोन शर्ट, १ पँट, दाताचा ब्रश, कंगवा, पेस्ट वगैरेची पहिली खरेदी झाली. नंतर दुपारी प्रदर्शनाच्या ग्राउंडवर जाऊन स्टॉल लावला. आम्ही सांगितलेल्यापेक्षा बरोबर उलटा (मिरर टाइपमध्ये) स्टॉल मिळाला. त्यामुळे बऱ्याच गोष्टींची जळवाजुळव करावी लागली व एकदाचा स्टॉल सजला.

दुसऱ्या दिवशी प्रदर्शन सुरू झाले. वस्तू सर्वांना खूप आवडत होती. आणलेले स्पॅनर विकू लागले. टेस्ट बेंचवर दोन तगडे जर्मन, दोन हातांत दोन स्पॅनर घेऊन जिवानिशी ताकद लावत होते. कारण स्पॅनर हाताने तोडल्यास फुकट देण्याची जाहिरात केली होती. बरेच इंडियन येऊन फुकट सॅम्पल घेऊन जात होते. एक जर्मन मुलगी मदतीसाठी ठेवली होती. जर कोणाला इंग्लिश येत नसेल तर ती उपयोगी पडायची.

तिसऱ्याच म्हणजे शेवटच्या दिवशी ज्याने ओरिजिनल स्पॅनर डेव्हलप केला होता. तो स्वीस माणूस आला व भांडायला लागला. माझा पेटंट आहे, तुम्ही हा ठेवू शकत नाही. मी तुमच्यावर इंटरनॅशनल कोर्टमध्ये केस करीन. तिथूनच आम्ही आमच्या वकिलाला फोन लावला. त्यांनी काळजी करायचे कारण नाही असे सांगितले. कारण आम्हीपण पेटंटचा अर्ज केला होता व तो पास झाला होता. पण त्यानंतर मनावर एक प्रकारचे दडपण आले.

दुसऱ्या दिवशी सारब्रोकनला एका मोठ्या जर्मन डीलरबरोबर मीटिंग होती. त्याची मोठी फर्म होती. काम झाले तर चांगला फायदा होणार होता. त्यांनी चांगला इंटरेस्ट दाखविला. पण तो फारच सावधपणे बोलत होता. एक तर त्यांना चांगले इंग्लिश समजतच नव्हते व त्यांचा सल्लागार चांगलाच कसलेला बिझिनेसमन होता.

दुसऱ्या दिवशी आम्ही इना फॅक्टरी पहायला जाणार होतो. विद्युत मोटर्सचे श्री. कीर्तीभाई यांनी आमची इना कंपनीच्या डायरेक्टरशी अपॉइंटमेट नक्की केली होती. आम्ही त्यांना फोन करून आम्ही येत असल्याचे कळविले. त्यांनी सकाळी हॉटेलवरून आम्हाला पिकअप करायचे नक्की केले. आमच्याकडे पत्ता नव्हता. जर्मनमध्ये हॅमबर्ग हे मोठे बंदर आहे. पण इनाचा प्लॅन्ट होमबर्गला आहे व होमबर्ग हे लहानसे गाव सारब्रोकनच्या बाजूला आहे. पण आमच्या डोक्यात हॅमबर्गच होते. म्हणून आम्ही सकाळी लवकर गाडीने निघून जर्मनीच्या दक्षिणेहून ६५० कि.मी.चा प्रवास करून रात्री हॅमबर्गला पोहचलो. जेमतेम एका हॉटेलमध्ये दुसऱ्या मजल्यावर खोली मिळाली. लिफ्ट नसल्याने जड सामान उचलून वर गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना फोन केला व आमच्या हॉटेलचा पत्ता सांगितला. त्यांचा परत फोन आला, आमच्या गावचा हा पत्ता नाही व हे हॉटेल पण इथे नाही. तुमच्या जवळचे रेल्वे स्टेशन कोणते? आम्ही सांगितले हॅमबर्ग, मग त्यांना शंका आली. त्यांनी स्पेलिंग विचारले तेव्हा समजले ते होमबर्गला होते व आम्ही हॅमबर्गला ६५० कि.मी. दूर होतो. शेवटी फोनवरच सॉरी म्हणून आम्ही दुसऱ्या दिवशी एका एजंटबरोबर ब्रुसेल्सला त्याच्या गोडाऊनवर गेलो. तो नवीन नवीन प्रॉडक्टमध्ये डिलिंग करत होता. मी बेअरिंग लाइनमध्ये आहे हे समजल्यावर त्यांनी काही बेअरिंगची ड्रॉइंगपण कोटेशनसाठी दिली.

असा अनेक मुश्किलीचा प्रवास सुमारे १० दिवसांनी पुरा झाला. तेव्हापासून ठरवले हातातल्या बॅगमध्ये निदान दोन जोडी कपडे तरी ठेवायचेच.

***क्रमशः***

## सुविचार

मुलांनो भाग्याने अतिविकल वंशी निपजला
शिरी कर्तव्याचा भार उचलण्यास आज सजलां
यशाच्या दुग्धाब्धि निजवडील न्हातील सगळे
असे वागा जेणे सुजन हृदया पाझर गळे।

# आगीशी खेळणारी लढवय्यी

**उच्च शिक्षणासाठी अमेरिका गाठलेल्या श्वेता चक्रदेव यांनी तिथे सामाजिक बांधिलकी जपली. परदेशामध्ये मराठी मंडळाच्या माध्यमातून आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न त्या करतात. प्रामुख्यानं सेवाभावी वृत्तीनं चालणाऱ्या अमेरिकेत अग्निशमन दलात सहभागी होण्यासाठी त्यांचं कठोर प्रशिक्षण त्यांनी पूर्ण केलं आहे. फायर फायटर म्हणून काम करणाऱ्या त्या एकमेव महिला आणि भारतीय आहेत.**

पेशानं त्या फार्माकॉलॉजिस्ट. सध्या रिसर्चर म्हणून काम. लेखनाची आवड असल्यामुळे दिवाळी अंकात लेखन. शास्त्रीय संगीताचं रीतसर शिक्षण घेतल्यानं त्यात रुची आणि सादरीकरणाची आवडही उपजत. अमेरिकेमधल्या मराठी मंडळामध्ये सक्रिय सहभाग... आणि आपलं करिअर सांभाळत कला आणि आवड जोपासण्याची ही तारेवरची कसरत. पण, ही कसरत इथेच संपत नाही. वैयक्तिक आयुष्यात स्वतःला समृद्ध करत असताना सामाजिक बांधिलकीही जपायला हवी या जाणिवेतून थेट फायर फायटर म्हणून आगीशी खेळण्याची जिगरही त्यांच्यात आहे.

अमेरिकेच्या पेन्सिलव्हेनिया प्रांतातल्या पीटबर्ग इथे क्रॅनबेरी टाऊनशिपमध्ये राहणाऱ्या आणि मूळ कल्याणच्या असणाऱ्या मराठमोळ्या श्वेता चक्रदेव यांची ही ओळख. कल्याणच्या ओक हायस्कूलमध्ये मराठी माध्यमातून त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर बेलापूरच्या फार्मसी कॉलेजमधून त्यांनी पदवी शिक्षण घेतलं. संशोधनात विशेष रुची असल्यामुळे त्यांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेची वाट धरली. परक्या देशात जाऊन उच्च शिक्षण पूर्ण करत असताना त्यांनी कला, भाषा आणि सामाजिक बांधिलकीचा विसर पडू दिला नाही. ब्रेस्ट आणि फुफ्फुसाच्या कर्करोगासंदर्भात फार्माकॉलॉजिस्ट म्हणून संशोधन करत या क्षेत्रात त्या स्थिरावल्या आहेत. आज क्लिनिकल रिसर्चर म्हणून अत्यंत जबाबदारीचं काम त्या समर्थपणे सांभाळत असतात. पण, आपली ओळख इतकीच राहू नये, असं त्यांनी सुरुवातीपासूनच ठरवलं आणि त्याला कृतीचीही जोड दिली.

सामान्यपणे परदेशी स्थिरावल्यावर तिथे येणारी मंडळी ही आपल्या राज्यातील, प्रांतातील, देशातील मंडळींना धरून राहतात. पण, आपलं मूळ न सोडता इतरांना आपलंसं करणं यातही समृद्धतेचाच अनुभव असतो, हे लक्षात घेऊन तिथल्या मातीशी त्यांनी एकरूप व्हायचं ठरवलं. अमेरिकेत आल्यावर मराठी नागरिक आणि भारतीयांशी नातं जोडताना मूळ अमेरिकी नागरिकांशीही त्यांनी वेगळे बंध निर्माण केले. त्यातून त्यांच्या वाटा अधिक विस्तारल्या. नव्या देशातही आपले सण, समारंभ, संस्कृती जपण्याचा त्या आवर्जून प्रयत्न करत असतात. ११ वर्षांच्या वास्तव्यात हा अनुभव त्यांनी घेतलाच, पण त्याचबरोबर आपण राहत असलेल्या मातीसाठी आपली सेवा रुजू करणं, आपलं कर्तव्य आहे या भावनेतून करिअरच्या वाटेवर चालताना एक वेगळं क्षेत्रही त्यांनी निवडलं.




अमेरिकेत अग्निशमन दल हे सेवाभावी वृत्तीनं चालतं. इथे पाच टक्के सरकारी कर्मचारी, तर उर्वरित नागरिकांच्या सहभागातून हे दल चालतं. त्यामुळे श्वेता यांनी अग्निशमन दलाचा भाग होण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी आवश्यक असणारं रीतसर प्रशिक्षणही घेतलं. १५ किलो वजनाचा पोशाख घालून अग्निशमनाचं साहित्य हातात घेत हे काम करणं हे जबाबदारीचं काम आहे. त्यासाठी पाच-सहा महिन्यांचं कठीण प्रशिक्षण घ्यावं लागतं. पण, त्यांनी ते जिद्दीनं पूर्ण केलं. त्या राहत असलेल्या टाऊनशिपच्या केंद्रामध्ये फायर फायटर म्हणून काम करणाऱ्या त्या एकमेव महिला आणि भारतीय आहेत. इथे केवळ तीन सरकार नियुक्त कर्मचारी असून बाकी सामाजिक

बांधिलकीच्या भावनेतून काम करणारे स्थानिक आहेत. इथल्या स्थानिक पुरुषांच्या बरोबरीनं त्या आपलं कर्तव्य पार पाडत असतात. कर्तव्यामध्ये आपण कुठेही कमी पडू नये, असा त्यांचा प्रयत्न असतो.



**ढोलवादन आणि नाटकही**

परदेशामध्ये मराठी मंडळाच्या माध्यमातून आपले सण-संस्कृती जपण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. या मंडळाच्या माध्यमातून मकरसंक्रांत, गणपती आणि दिवाळी हे सण मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. सण साजरे करण्यासाठी केल्या जाणाऱ्या आयोजनामध्ये त्यांचा सहभाग असतो. मराठी नाटक बसवणं, गाण्यांचे कार्यक्रम, त्यांचं सादरीकरण, नियोजन याशिवाय ढोलताशा पथकामध्ये त्या ढोलवादन करतात. कडाक्याच्या थंडीच्या काळात शेल्टर होममधल्या लोकांसाठी उबदार कपडे गोळा करणे, बेघर-गरीब लोकांसाठी असलेल्या अन्नछत्रात जाऊन जेवण वाढणं अशी कामं करत त्या सामाजिक भान जपतात. ♦

## सुनंदा अरुण मराठे यांचा अमृत महोत्सव



कणकवली येथील कुलभगीनी सुनंदा मराठे यांचा अमृत महोत्सव कार्यक्रम दि ७ फेब्रुवारी २०२१ रोजी कणकवली येथील घराच्या अंगणात उत्साहात साजरा करण्यात आला. सुना, नातवंडे व मुलांनी मोठ्या उत्साहात ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यांचे वैशिष्ट्य म्हणजे फक्त मोजकेच नातेवाईक उपस्थित होते मात्र सर्व सख्या, ज्या कायम सोबत असतात त्यांनाच आमंत्रित केले होते व त्या





आवर्जून उत्साहात या कार्यक्रमात सामील झाल्या. कोरोनाचे नियम पाळत कार्यक्रमाचे नेटके आयोजन केले होते.

सुनंदा मराठे या जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे परिचारिका म्हणून यशस्वीपणे सेवा करून आता निवृत्तीचे आयुष्य देखील सामाजिक कामात सहभागी राहून व्यतीत करत आहेत. गावातील तसेच तालुक्यातील विविध सामाजिक उपक्रमात त्यांचा सहभाग असतो. विशेष म्हणजे लोकांना आपलेसे करण्याची त्यांची हातोटी असल्याने संपर्क दांडगा आहे. पुढील आयुष्यासाठी त्यांना भरभरून शुभेच्छा. ♦

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**